# Academic Year 2017-18

ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 7 | MARCH - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

# पारधी समाजातील महिलांची स्थिती

सौ. सुप्रिया संग्राम पवार
संशोधक विद्यार्थी , टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

• **प्रस्तावना :-**



पारधी ही एक भटकी जमात आहे. महाराष्ट्रामध्ये विशेषत: ही जमात खानदेश, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, बीड व पुणे याठिकाणी बहुसंख्याकाने स्थिर झाली आहे. या जमातीला इंग्रजांनी इ.स. १८७१ मध्ये क्रिमिनल ट्राईब्ज अॅक्ट नुसार या जमातीतील लोकांना गुन्हेगार म्हणूनच गणले गेले. इ. स. १९२४ मध्ये गुन्हेगार जमाती वसाहतीकरण कायदा आला व या कायद्यानुसार गुन्हेगार ठरविलेल्या या जमातीला तारेच्या कुंपनात डांबले गेले. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने ३१ ऑगस्ट १९५२ रोजी मुक्त करण्याकरिता हॅबिच्युअल ऑफिंडर्स अॅक्ट पारीत करून त्यांना विमुक्त जमाती म्हणून गणले गेले. परंतु या समाज व्यवस्थेने या जमातीस गुन्हेगार जमात म्हणून त्यांना अस्पृश्यासारखे वागवले. अद्यापही एखाद्या गावी पारधी समाजाने चोरी करो अथवा न करो त्यांनाच चोरटा म्हणून गृहीत धरले जाते.

अशा स्थितीत या समाजातील पुरुष कोणत्या न कोणत्या गुन्हयाखाली सातत्याने तुरुंगात असतो. त्याच्यामागे त्याचे कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होत असते. त्या समाजातील महिला या कुटूंबाची जबाबदारी एकटी घेते अशा वेळी या समाजातील महिलांना अनेक अडी-अडचणींना तोंड द्यावे लागते. या संशोधनात महिलांची सामाजिक स्थिती व स्त्रीवादी संघटना यांचे कार्य शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

• **संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. पारधी समाजातील महिलांची स्थिती अभ्यासणे.

• **संशोधन पद्धती :-**

संशोधनासाठी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्याची निवड केली व तेथे प्रत्यक्ष जाऊन मुलाखती घेतल्या व निरिक्षण पद्धतीने संशोधन केले.

• **पारधी महिलांची सामाजिक स्थिती :-**

**१. पारधी महिलांची जडणघडण :-**

आदिमानवासारखाच आहे. यामुळे आजही त्यांच्यात फारसा बदल नाही. पारधी महिलांच्या जडणघडणीचा अभ्यास करतांना आपल्याला असे लक्षात येते की, ही जमात सतत भटकत असल्याने आणि घरातील कुटुंब व्यवस्था छिन्न-विछिन्न अवस्थेत असल्याने पारधी मुलांची जडणघडण अशा कुटुंबातुन होत असते की, जेथे संस्कार म्हणजे काय? ते सुद्धा माहित नाही. यामुळे अत्यंत संस्कारहीन व अज्ञानी असणा-या कुटुंबात होत असते. या समाजातील मोठ्या लोंकांचे अनुकरण येथील लहान मुले करीत असतात. यामुळे या समाजात असणा-या अनेक संस्कारहिन कृत्य या समाजातील मुलांकडून होत असतात. यामध्ये दारू पिणे, वयाच्या आत लग्न करण्याची ओढ तयार होणे. यासारख्या अनेक अनिष्ठ बाबी यांच्यामध्ये असतात. आजही हा समाज जंगली आदिमानवासारखाच आहे.[1] यामुळे आजही त्यांच्यात फारसा बदल नाही.

## २. पारधी महिलांचे जीवनमान :-

पारधी महिलांचे जीवनमान अत्यंत कष्टप्रद आहे. शिक्षणाची कमतरता असल्याने अज्ञानी व अंधश्रद्धाळू असल्याचे दिसते. अनेक अनिष्ट चालीरीती रुढी परंपरा मधून अत्यंत उपेक्षित जीवनामन त्यांच्या वाटेला आलेले दिसते.[२] महिलांची बोलीभाषा ही गुजराथीसारखी आहे. ते सातत्याने पारधी भाषा बोलतात पण त्यांना मराठी भाषा समजते. बोलीभाषेचा इतिहास मात्र त्यांना माहित नाही.

## ३. पारधी समाजातील महिलांच्या चालिरीती :- रूढी परंपरा -

पारधी समाजामधील महिलांमध्ये अनेक चालिरीती रुढी परंपरा असल्याचे दिसते. यामध्ये पारधी पुरूष व स्त्रिया एकाच न्हानीमध्ये (बाथरूम) आंघोळ करीत नाहीत. लग्न झालेल्या महिलेच्या हातचे न खाण्याची प्रथा यांच्या समाजात असल्याने त्या स्त्रीच्या हातचे फक्त तिचा नवरा व मुलेच जेवण करतात. जर एखादा पाहुणा आला तर अशावेळी त्याला बाहेरून हॉटेलमधून जेवण मागवले जाते. पारधी महिलेला कोणीही पर पुरूष स्पर्श करीत नाही अथवा तिच्या कपड्यांनाही स्पर्श करीत नाही. पारधी महिलांची कपडे कितीही मौल्यवान असले तरी ते कपडे त्या घरात ठेवू शकत नाही. पारधी घराच्या समोर एका प्लॅस्टिकच्या कागदाखाली एक पेटी असते. त्या पेटीत तिचे कपडे ठेवून ती पेटी प्लॅस्टिक कागदाने झाकली जाते. त्या समाजात महिलांचा वाट पाळण्याची पद्धत आहे. महिलेने घरातील वस्तूंना चूकून जरी पाय लावल्यास त्या वस्तू घराबाहेर फेकल्या जातात. त्या पुन्हा वापरण्यास घेत नाहीत. व बाईचे लुगडे हे अतिशय पवित्र मानले जाते. एखाद्या बाईने नेसते लुगडे धूवून वाळत घातले असेल तर, लुगड्या घालून गेलेला एखादा पुरूष गुन्हेगार समजून जातपंचायत रोख रकमेचा दंड करते. बाईची साडी घरावर किंवा पालावर टाकणे गुन्हा मानले जाते. जात पंचायतीने सुनावलेल्या दंडाच्या रकमेसाठी स्त्रीला लिलावात मांडणे किंवा दंड भरणा-या पुरूषाकडे ती गहाण ठेवणे हे प्रकार परंपरेने या जमातीत चालत आले आहेत. कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी ही तिचीच असते.[३]

- **पारधी समाजातील धार्मिक निष्ठा व महिला :-**

पारधी समाजातील लोकांना देवकार्य यामध्ये खूप रूची असते. यासाठी देवकार्यामधील कुचराई ते कदापी करत नाही. देवकार्यामध्ये पारधी महिलांची सावली सुद्धा चालत नाही. महिलेने देव-देव करते वेळी देवाला स्पर्श करायचा नाही अथवा देवकार्यात सहभागी व्हायचे नाही. बाजूला बसूनच तो कार्यक्रम तिने पहायचा यासाठी अनेक दंतकथा सांगितल्या जातात यामधील तेथील महिलांनी एक दंतकथा सांगितली.[४] या दंतकथेनुसार महिला या लबाड असतात. खोटे बोलतात म्हणून देवीनेच प्रकट होवून सांगितले की तुम्ही माझी सेवा करायची नाही. असा समज सर्व समाजाचा आहे. त्यामुळे महिलांची मानसिकताच अशी झाली की देवदेव आपला अधिकार नाही.

- **पारधी महिला व विवाह :-**

पारधी समाजात बालविवाहाची प्रथा आहे. अत्यंत कमी वयात बालविवाह होतात. यामुळे याचा त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर त्याचा परिणाम होतो. विवाह हा पारधी समाजातील पद्धती मध्ये होतो. पण अलिकडील काळात विवाहाची पद्धत हिंदू धर्माप्रमणो होते. पारधी पुरूषांचे कितीही विवाह होतात पण स्त्रियांचे मात्र एकच होतो. दुस-यांदा केलेल्या लग्नाला विवाह किंवा लग्न न म्हणता त्या महिलेचा म्होतूर झाला किंवा पाठगोरी करणे असे म्हटले जाते.

- **पारधी महिला व व्यसनाधिनता :-**

या समाजातील महिलांना अत्यंत त्रास सहन करावा लागतो. या समाजातील महिलांना इतर समाजातील घटक सुद्धा सामावून घेत नाहीत. एकाच वेळी तिला दोन द्वंद्वांना सामोरे जावे लागते. पहिले म्हणजे अंतर्गत व्यवस्थेशी व दुसरे म्हणजे समाजातील इतर घटकांकडून होणारी वागणूक यामध्ये कधी कधी या महिला त्रास सहन न झाल्याने दारूची नशा करत असत.[५] सध्या महिलांना तंबाखू, गुटखा, मिश्री यासारखी व्यसनाधिनता असल्याचे दिसते.

- **पारधी महिला व लैंगिक शोषण :-**

पारधी महिलांचे पुरूष सातत्याने तुरुंगात असल्याने त्यांना सोडविण्यासाठी महिलांनी अनेक प्रकारचे प्रयत्न करावे लागत असतात. अनेक प्रश्न तिच्यासमोर तयार होतात. कुटुंबाचा सर्व भार तिच्यावर सेवून त्याच बरोबर नव-याची तुरुंगातून सुटका करणे ही समस्या तिला असते. अशावेळी इतर समाज घटकांकडून तिच्यावर बलात्कारासारखे प्रकार घडत असतात. व यासाठी उत्तरदात्याने संशोधकाला शत्रो काळे प्रकरण सांगितले.[६] या प्रसिद्ध केसमध्ये या महिला पंच होत्या. आमच्यात देवदेव करत असतानां बायकांना चांगले स्थान होते. देवदेव करताना सहभागी करून घेतल जायच, पण आमच्या समद्या बायात एक अशी बाई होती की, समदे झेपले की, ती देवदेव करताना चांगल चुंगल पु-या बि-या करायची. सगळी झोपली की, समद खायची, देवाचं खायची देवाला नैवेद्य दाखवायच्या आधी तिच खायची आणि देवाला म्हणायची जर तू माझी खोड सांगितली की तुझ्या नावाची चप्पल करीन म्हंजी ती चप्पल उलटी करीत आणि नंतर ती गोंधळ करायची आणि म्हणायची की

VOLUME - 4 | ISSUE - 7 | MARCH - 2018

मला प्रसारद मिळाला नाय असं नाय तसं नाय मग त्या बाईचा नवरा कायम देवदेव करून थकला एक दिवस तिचा नवरा ही काय भानगड आहे म्हणून शोध घेण्यासाठी रात्रभर जागायचं असं ठरवतो. कारण तो देवदेव करून कंटाळला होता. त्याला वाटलं आज छडाच लावायचा म्हणून त्यादिवशी त्याने आपलं बोट कापून घेतलं म्हंजी त्या बोटाची आग-आग झाल्यावर झोप येवुन ये म्हणून आणि रातभर जागा राहिलस असं का व्हतय हे त्याला बघायचं होतं. त्यानं अंगावर घेतल्याचं नाटक केलं आणि लक्ष ठेवलं तेवढयात ती बाई नेहमीप्रमाणे उठली आणि देवाच्या नैवेद्याआधी खाऊन घेण्याचा कार्यक्रम सुरू केला. तेवढ्यातच तो उठला आणि त्याने तिच्या झिंझ्या धरल्या त्यामुळे देवीचा कोप झाला. त्यामुळे देवी म्हणाली की, या बायांना तुटक करा व माझा प्रसाद गड्यांनीच करा. तेव्हापासून या बायांना देवदेव करतांना हात लावू देत नाही आणि त्यानंतरच बायांची छी-थू झाली. नंतर त्यांना शिवायचं नाय, घरात लुगडी ठेवायची नाय, देव-देवतांना हात लावायचं नाय असं ठरवलं गेलं. त्याच्या आधी सर्व बायकांना चालायचं तेव्हापासून बायका तुटक झाल्या. त्यांचं मन ताब्यात नाय.[६]

याचबरोबर त्यांच्या कुटुंबियांकडूनसुद्धा त्यांच्यावर बलात्कार केला जातो. शिवाय त्यांनी नव-याला सोडविण्यासाठी किंवा अन्य कारणासाठी जर एखाद्या पारधी समाजातील व्यक्तिकडून पैसे व्याजाने घेतले असतील तर व्याज परत न दिल्यास त्या घरातील महिलेला किंवा पोरीला तो माणूस आपल्या घरी घेवून जावू शकतो. अशावेळी तिच्यावर अनेकवेळा लैंगिक अत्याचारसुद्धा होतात.

- **पारधी महिला व जातपंचायत :-**

हा समाज त्यांचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी जातपंचायतीचे आधार घेत असत . पंच हे पैसे खाऊ असल्याने त्यांच्याकडून महिलांना न्याय मिळेलच याची खात्री नसते. एखाद्या महिलेचे पावित्र्य सिद्ध करण्यासाठी हातावर तप्त कु-हाडीचे पाते पिंपळाच्या पानावर ठेवून ते हातावर घेवून जाणे, विहीरीत बुडवणे, पायातील जोडव्या तापवून कपाळावर चटके देणे यासारख्या अघोरी शिक्षा जातपंचायत देते व अंतर्गत लैंगिक शोषण झाल्यास प्रत्येक वेळी न्याय मिळेलच याची खात्री नसते.

- **पारधी महिला व त्यांचे आरोग्य :-**

सततचे शिळे अन्न मागून खाणे, बालविवाह व घाणेरडापणा यामुळे यांच्यात अनेक रोगराई उत्पन्न होतात. महिलांना महिलांचे संदर्भातील आजार आहेत. पण काही दवाखान्यामध्ये इतर समाज घटकातील लोक त्यांना स्पर्श न करता फक्त गोळ्या व औषधे देतात. यामुळे त्यांच्यावर उपचार होत नाहीत असे मुलाखतीवेळी लक्षात आले. यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न अधिकच जटील होत आहे.

- **निष्कर्ष :-**

एकूणच या समाजातील महिलांची सामाजिक स्थिती अभ्यासत असताना असे जाणवते की, या महिला अद्यापही अत्यंत कष्टप्रद व हालाखीचे जीवन जगत आहेत. संशोधनावरून त्यांचे अनेक सामाजिक प्रश्न जसे की बालविवाह, अनेक चालीरिती, रूढी परंपरा यातून त्यांना मिळणारी अपमानास्पद वागणूक इतर समाजघटकांमधून होणारी अवहेलना लैंगिक शोषण, आरोग्याचे प्रश्न यासारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. किंबहुना पारधी महिलेचा माणूसकी म्हणून तिच्या मनाचा कसलाही विचार आजतागायत होताना दिसत नाही अनेक सामाजिक संस्था, चळवळी त्यांच्यापर्यंत पोहोचल्या नाहीत. यासाठी लीन कुमार बावने म्हणतात, मनुष्याचा सामाजिक दर्जा त्याला मिळालेल्या नागरीकपणावर, स्वातंत्रतेवर आणि कौटुंबिक संबंधावर अवलंबून असतो परंतु भटक्या -विमुक्तांना यापैकी कोणतेच स्वातंत्र्य व नागरीकत्व या देशातील समाजव्यवस्थेने दिलेले नाही.[७] समाजव्यवस्थेतील ही उतरंड अद्यापही अशा महिलांच्या उपेक्षितपणाला व त्यांच्या एकूणच जडणघडणीला जबाबदार आहे.

- **संदर्भसूची :-**


१. संतोष पवार, पारध्यांची जातपंचायत; औरंगाबाद पृ. ५५
२. प्रत्यक्ष मुलाखत, सपना अनिल भोसले; बेलवंडी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर
३. भटक्या विमुक्तांची जात पंचायत; खंड १ चव्हाण सोमनाथ; देशमुख कंपनी प्रा. लि. ४७३ सदाशिव पेठ, पुणे पृ. क्र. ९२
४. प्रत्यक्ष मुलाखत निर्मला आसाराम काळे; मडकेवाडी
५. प्रत्यक्ष मुलाखत शितल संतोष काळे; गणेशनगर राहाता, अहमदनगर.
६. मिराबाई संतोष पिंगळे प्रत्यक्ष मुलाखत एकरूखे राहाता; अहमदनगर
७. लीन कुमार बावने; (२०००) भटक्यांचा भग्न संसार आणि संस्कृती ; द्वि. आ. वर्धा. पृष्ठ. ५३.

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Research Journal

Vidyawarta®

शुक्रवार दि.२ व शनिवार दि.३ फेब्रुवारी
बी.सी.यु.डी.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे
व
रयत शिक्षण संस्थेचे

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय

श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर

यांच्या संयुक्त विद्यमाने
दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र



# स्थानिक इतिहास आणि त्याचे महत्व

प्राचार्य डॉ.के.म्हस्के    प्रा.सुप्रिया पवार

समन्वयक
प्रा.आर.एन.थोरात

322

Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No. 62759 Vidyawarta® February 2018 Special Issue

19

# सातारा जिल्ह्याचे भारतीय लष्करी सेवेतील योगदान

किरण गणपत कुंभार
संशोधक विद्यार्थी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

==========================================

प्रस्तावना

१५ ऑगष्ट १९४७ रोजीआपलाभारतदेश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यमिळाल्यानंतरआपल्याभारतासमोरकाहीसमस्यानिर्माणझाल्यात्यासमस्यांमध्ये भारताचे शेजारीलराष्ट्रांशीअसलेलेवाद व त्यातूननिर्माणहोणारेसंघर्षही एकसमस्याहोती. त्यासाठीचभारतीय सीमांचेसंरक्षणकरणे व प्राप्तस्वातंत्र्य टिकवणेहीजबाबदारीसशस्त्र दलांनीआपल्याहाती घेतली. हीजबाबदारीपारपाडतानाअनेक लढाया लढल्याआपण लढाया लढलो की त्यातील घटनाइतिहासजमाहोतात. आजआपणज्यास्वातंत्र्याचाउपभोग घेतोतेस्वातंत्र्यसैनिकांच्यात्याग व बलिदानामुळेचआबादीतराहिलेआहे. सैनिकप्रसंगीआपल्याप्राणाचीपरवा न करताभारतीय सीमांचे रक्षणकरतातम्हणूनचत्यागाची व बलिदानाचीज्यांनी शपथ घेतलीअशालष्करीसेवेतीलसैनिकांच्या योगदानाचाअभ्यासहोणेगरजेचेआहे. कोहिमा येथीलएका शहिदसैनिकाच्यासमाधीवरपुढीलओळीलिहीलेल्याआहेत. "जबआप घरजाएंतोउन्हेबताएंऔरकहेंकि उनके कलके लियेहमनेअपनाआज दे दिया" आहे.

महाराष्ट्रातीलप्रत्येकजिल्हयाचीवेगळीओळख सातारजिल्हाहा 'शुर–विरांचा 'जिल्हाआणि 'लष्करी जिल्हा 'म्हणूनओळखलाजातो. साताराजिल्हयालालष्करीपरंपराफारजूनीआहे. छत्रपतीशिवाजीमहाराजांच्यास्वराज्यातील घटकअसलेलासाताराजिल्हामराठयांच्यास्वातंत्र्य युध्दातहीअग्रेसरहोता. पेशवाईतस्वतः छत्रपती शाहूसाताराचेनिवासीझाले व मराठासाम्राज्याचीसुत्रे सातारा येथूनचसंचालीतकेलीजावूलागली. मराठीसाम्राज्याच्याअस्तानंतरब्रिटीशकाळामध्ये १८५७ च्याउठावातसाताराजिल्हाहीअग्रेसरहोता. ब्रिटीशांच्यावर्चस्वाखालीसाताराजिल्हयानेपहिल्या व दुस–या विश्व युध्दातमित्र राष्ट्रांच्याबाजूनेसहभाग घेतला. हीचपरंपरापुढे



323
Scanned by CamScanner

लष्करीपरंपरालाभलेल्यासातारजिल्हयातसन २०१४ पर्यंतसेवानिवृत्तसैनिकआणिसैनिकांच्याविधवापत्नी यांचीआकडेवारी खालिलटेबल क्र १मध्ये दर्शवली आहे.[३]

| MAHARASHTRA | | | Ex-servicemen | | | | Widows | | | Grand Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| No | Dirstict | Army | Air Force | Navy | Total | Army | Air Force | Navy | Total | |
| 1 | Ahmednagar | 6155 | 287 | 354 | 6796 | 2240 | 48 | 20 | 2308 | 9104 |
| 2 | Akola | 1789 | 90 | 45 | 1924 | 691 | 15 | 12 | 718 | 2642 |
| 3 | Amravati | 3229 | 107 | 37 | 3373 | 1306 | 14 | 2 | 1322 | 4695 |
| 4 | Aurangabad | 3586 | 209 | 154 | 3949 | 883 | 30 | 17 | 930 | 4879 |
| 5 | Beed | 2840 | 12 | 20 | 2872 | 562 | 2 | 3 | 567 | 3439 |
| 6 | Bhandara | 732 | 18 | 20 | 770 | 121 | 0 | 4 | 125 | 895 |
| 7 | Buldhana | 3883 | 58 | 25 | 3966 | 1361 | 5 | 7 | 1373 | 5339 |
| 8 | Chandrapur | 964 | 52 | 38 | 1054 | 241 | 14 | 4 | 259 | 1313 |
| 9 | Dhule | 1220 | 62 | 17 | 1299 | 383 | 4 | 5 | 392 | 1691 |
| 10 | Gadghiroli | 96 | 4 | 0 | 100 | 19 | 0 | 0 | 19 | 119 |
| 11 | Gondia | 656 | 13 | 8 | 677 | 89 | 2 | 1 | 92 | 769 |
| 12 | Hingoli | 401 | 4 | 5 | 410 | 120 | 1 | 0 | 121 | 531 |
| 13 | Jalgaon | 2508 | 199 | 62 | 2769 | 684 | 34 | 8 | 726 | 3495 |
| 14 | Jalna | 1044 | 20 | 16 | 1080 | 281 | 3 | 1 | 285 | 1365 |
| 15 | Kolhapur | 10426 | 341 | 362 | 11129 | 4293 | 91 | 51 | 4435 | 15564 |
| 16 | Latur | 2989 | 32 | 19 | 3040 | 544 | 5 | 1 | 550 | 3590 |
| 17 | Mumbai City | 4406 | 491 | 3969 | 8866 | 359 | 38 | 68 | 465 | 9331 |
| 18 | Mumbai Sub | 5616 | 1484 | 2283 | 9383 | 1214 | 138 | 138 | 1490 | 10873 |
| 19 | Nandurbar | 202 | 17 | 3 | 222 | 90 | 11 | 3 | 104 | 326 |
| 20 | Nagpur | 4013 | 367 | 886 | 5266 | 1230 | 146 | 62 | 1438 | 6704 |
| 21 | Nanded | 1004 | 36 | 12 | 1052 | 230 | 3 | 2 | 235 | 1287 |
| 22 | Osmanabad | 3293 | 29 | 32 | 3354 | 843 | 2 | 1 | 846 | 4200 |
| 23 | Nasik | 4814 | 1261 | 248 | 6323 | 1054 | 98 | 16 | 1168 | 7491 |
| 24 | Parbhani | 691 | 15 | 8 | 714 | 151 | 2 | 0 | 153 | 867 |
| 25 | Pune | 19656 | 3754 | 1915 | 25325 | 3718 | 501 | 179 | 4398 | 29723 |
| 26 | Raigad | 2883 | 147 | 386 | 3416 | 1984 | 17 | 15 | 2016 | 5432 |
| 27 | Ratnagiri | 3805 | 66 | 103 | 3974 | 3381 | 18 | 150 | 3549 | 7523 |
| **28** | **Satara** | **16624** | **338** | **421** | **17383** | **7220** | **70** | **39** | **7329** | **24712** |
| 29 | Sangli | 13282 | 239 | 280 | 13801 | 5118 | 132 | 57 | 5307 | 19108 |
| 30 | Sindhudurg | 3131 | 62 | 42 | 3235 | 2214 | 15 | 9 | 2238 | 5473 |
| 31 | Solapur | 5766 | 217 | 121 | 6104 | 2177 | 37 | 9 | 2223 | 8327 |
| 32 | Thane | 5485 | 1458 | 2778 | 9721 | 1056 | 110 | 149 | 1315 | 11036 |
| 33 | Wardha | 1032 | 80 | 30 | 1142 | 325 | 16 | 6 | 347 | 1489 |
| 34 | Washim | 679 | 20 | 6 | 705 | 299 | 6 | 0 | 305 | 1010 |
| 35 | Yavatmal | 1095 | 66 | 22 | 1183 | 583 | 18 | 6 | 607 | 1790 |
| RSB TOTAL | | 139995 | 11655 | 14727 | 166377 | 47064 | 1616 | 1045 | 49755 | 216132 |

टेबल क्र १

**लष्करकडूनकेलेलासन्मान**



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No. 62759
Vidyawarta®
February 2018
Special Issue

साताराजिल्हयातीलकाहीशहिदसैनिकांचीनावेपुढीप्रमानेकर्णलसंतोषमहाडिक,सुनिल यादव,सतिशशिंदे,श्रीरंगसावंत,इमाममहम्मद शेख,एकनाथ सखाराममनिकम, दिनकर यशवंतनिकम, प्रल्हादतुकाराममनिकम, बाबुरावधायगुडे, अशोकबाबरइत्यादी. अनेकलष्करीकारवायांमध्ये साताराजिल्हयातीलसैनिक शहिद व जायबंदझालेअसे २२५ जवानदेशसेवेसाठीकर्तव्य बजावताना शहिदझालेआहेत.शहिदसैनिकांचीआकडेवारीटेबल क्र ३ मध्येदाखविले आहे.[६]

TAILS OF BATTLE CASUALTIES WHO HAVE LAID DOWN THEIR LIVES IN VARIOUS OPERATIONS SINCE 1962 To 28.02.2013 (GR 17.7.20

| Sr No | District | 1962 | 1965 | 1971 | Ahat | Meghdoot | Pawan | Rakshak | Bodo Ulfa | Blue Star | Orchid | Ambush | Rhino | Savage | Battle Axe | Falcon | Mizo/Naga | Kargil | After Kargil | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mumbai City | | 1 | 4 | | | | | | | | | | | | | | | 2 | 7 |
| 2 | Mumbai Sub | | 3 | 3 | | | 1 | 2 | | | | 1 | | | | | | | 9 | 19 |
| 3 | Thane | 1 | 1 | 8 | | | | | | | | | | | | | | | 4 | 14 |
| 4 | Raigarh | 3 | 8 | 16 | | 4 | | 3 | | | | | | | | | | | 5 | 39 |
| 5 | Sindhudurg | 5 | 9 | 10 | | | 5 | 2 | | | | | 2 | | 1 | 2 | | | 6 | 42 |
| 6 | Ratnagiri | 9 | 14 | 14 | | 1 | | 5 | | | | | | | | | | | 3 | 46 |
| 7 | Nashik | 2 | 2 | | | | 4 | 3 | | | 1 | | | 3 | | | | 1 | 22 | 38 |
| 8 | Dhule | | 2 | | | | | 4 | | | 2 | | 2 | | | | | | 5 | 15 |
| 9 | Nandurbar | | | | | | | | | | | | | | | | | | 0 | 9 |
| 10 | Jalgaon | 1 | | | | 2 | 1 | 6 | | | 2 | | | | | | | | 16 | 38 |
| 11 | Ahmednagar | | 3 | 9 | | 3 | 3 | 2 | 6 | 1 | | | 3 | | | | | | 21 | 53 |
| 12 | Pune | | 12 | 12 | | 2 | 4 | 6 | | | 2 | 1 | 1 | | | 1 | | 1 | 25 | 71 |
| **13** | **Satara** | **19** | **58** | **66** | | **7** | **12** | **14** | | | **1** | **1** | | | | **1** | **6** | | **40** | **225** |
| 14 | Sangli | 7 | 28 | 46 | | 9 | 12 | 10 | | | 1 | | 12 | | 1 | 3 | | 2 | 33 | 164 |
| 15 | Solapur | 2 | 13 | 11 | | 2 | 6 | 5 | | | | | 1 | | | 1 | | | 20 | 61 |
| 16 | Kolhapur | 4 | 18 | 46 | | 4 | 19 | 38 | | | 9 | 3 | 4 | | | | | 1 | 33 | 79 |
| 17 | Aurangabad | 1 | 2 | 3 | | | | 7 | | 1 | | | | | | | | | 9 | 23 |
| 18 | Jalana | | 1 | | | 1 | | | | | | | | | | | | | | 2 |
| 19 | Parbhani | | | | | | | 2 | | | | | 1 | | | | | | 1 | 4 |
| 20 | Hingoli | | | | | | | | | | | | | | | | | | 3 | 3 |
| 21 | Beed | 1 | 2 | 5 | | 1 | 2 | 8 | | | | | | | | | | 1 | 13 | 33 |
| 22 | Nanded | 1 | | | | | | 2 | | 1 | | | | | | | | | 4 | 18 |
| 23 | Osmanabad | 1 | | 4 | | | 3 | | | 1 | | | | | | | | | 4 | 13 |
| 24 | Latur | | 2 | 1 | | 2 | | 3 | | | | 1 | | | | | | | 11 | 20 |
| 25 | Amaravati | | 1 | 1 | | | 2 | 2 | | | | | | | | | | | 7 | 13 |
| 26 | Buldhana | | | 11 | 1 | 3 | 6 | | | | | | | | | | 1 | | 4 | 30 |
| 27 | Akola | 1 | 7 | 2 | | 1 | 8 | 3 | | | | | 1 | | | | | | 4 | 27 |
| 28 | Washim | | | | | | | | | | | | | | | | | | 2 | 2 |
| 29 | Yavatmal | | 1 | 6 | | | | 2 | | | | | 2 | | | | | | 9 | 20 |
| 30 | Nagpur | 1 | 6 | 6 | | | | 2 | | | | | 3 | | | | | | 7 | 25 |
| 31 | Wardha | | | | | | | 2 | | | | | | | | | | | 3 | 5 |
| 32 | Bhandara | | | 2 | | 1 | | 6 | | | | | | | 1 | | | | 3 | 13 |
| 33 | Gondia | | | | | | | | | | | | | | | | | | 2 | 2 |
| 34 | Chandrapur | | 1 | 1 | | | | | | | | | | | | | | | 5 | 7 |
| 35 | Gadchiroli | | | | | | | 2 | | | | | | | | | | | 1 | 3 |
| | Total | 63 | 195 | 287 | | 43 | 88 | 141 | 6 | 4 | 18 | 7 | 32 | 3 | 3 | 8 | 7 | 6 | 338 | 1249 |

टेबल क्र ३



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No. 62759 Vidyawarta® February 2018 Special Issue 01

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

संपादक मंडल

मुख्य संपादक

प्रा.शहिस्ता देवेंद्र (हिंदी) डॉ. योगिता रांधवणे (मराठी)

सहायक संपादक

प्रा.नारायण शिंदे डॉ. राजेंद्र ठाकरे

डॉ. नीतिन भोसले प्रा. बापु देवकर

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vaidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors



MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No. 62759 Vidyawarta® February 2018 Special Issue 02

Dr. Babasaheb Ambedkar Maha... Aundh, Pune-67

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No. 62759
Vidyawarta®
February 2018 Special Issue
04

# INDEX


| | | |
|---|---|---|
| 1. | संत चोखामेळा यांचे अभंग<br>प्रा.विजयकुमार रामदास चोडके, डॉ.राजेंद्र ठाकरे* | 10 |
| 2. | [illegible] | 16 |
| 3. | मराठी संत साहित्यातील विविध विचार<br>प्रा. मोरे भास्कर निवृत्ती | 20 |
| 4. | कर्मयोगी संत गाडगेबाबा<br>सहा प्रा. दादा मच्छिंद्र समुद्र | 24 |
| 5. | "मराठी संत साहित्य परंपरा व स्वरुप"<br>प्रा. डॉ. बोडखे जी.पी. | 29 |
| 6. | मराठी जैन संत साहित्य<br>प्रा.डॉ. जगदीश आवटे, | 33 |
| 7. | संत साहित्य परंपरा व स्वरूप<br>डॉ. भास्कर निफाडे, | 36 |
| 8. | संत - चोखामेळा यांच्या अभंगातील आत्मनिवेदन<br>डॉ. योगिता मारुती रांधवणे | 39 |
| 9. | "समाज सुधारक : संत तुकाराम"<br>डॉ.अनिल गर्जे, गिन्हे ज्ञानदेव किसनदेव | 42 |
| 10. | मराठी संत साहित्यातील स्त्रीचित्रण<br>प्रा. जाधव विजय साहेबराव | 46 |
| 11. | समाज प्रबोधनकार : संत तुकाराम<br>प्रा. डॉ. जालिंदर कानडे | 49 |
| 12. | संत नाम देवांच्या अभंगातील नवविधा भक्तीचे स्वरुप<br>श्री लक्ष्मण कोठावळे | 52 |
| 13. | मराठी संत साहित्य विविध विचार<br>प्रा. दत्तात्रय सदाशिव सावंत | 56 |
| 14. | मराठी संत साहित्यातील भक्ती स्वरूप<br>प्रा. कल्पना तवाजी रोकडे | 60 |
| 15. | संत तुकारामांच्या काव्यातील समाजजीवन<br>श्री. नवनाथ केरू रकटे | 69 |
| 16. | मराठीसंत साहित्यातील ज्ञानेश्वरांचे योगदान<br>प्रा. गोटे मच्छिंद्र रामचंद्र, डॉ.राजेंद्र ठाकरे* | 72 |
| 17. | ।। संत तुकारामांच्या अभंगातील बुवाबाजीचे चित्रण ।।<br>प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर | 77 |
| 18. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता<br>प्रा. सुधीर ब. मोरे | 82 |
| 19. | "मराठी संत कवयित्रींच्या अध्यात्मिक वाटचालीची परंपरा"<br>श्रीमती सुनिता आव्हे, | 86 |




327

Vidyawarta : Interdisciplinary Multilingual Refereed Journal Impact Factor 5.131 (IIJIF)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | UGC Approved Sr.No. 62759 | Vidyawarta® | February 2018 Special Issue | 077

17

# ।संत तुकारामांच्या अभंगातील बुवाबाजीचे चित्रण।।

**प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर**
मराठी विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध, पुणे.

================================================================

## १.१ प्रास्ताविक

महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभलेली आहे. समाजातील विसंगतीवर प्रकाश टाकून समाजाला सन्मार्गावर आणण्याचे महत्कार्य संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत रामदास व संत तुकाराम आदी संतांनी केलेले आहे. महाराष्ट्राची आजची जी काही सांस्कृतिक परंपरा आहे. या परंपरेत संतांचे कार्य व योगदान अतुलनीय आहे. भक्ती, ज्ञान, वैराग्य, समाजप्रबोधन, नीतीची शिकवण या अनेक हेतूने संतांच्या वाङ्मयाची निर्मिती झालेली आहे. मराठी मन व मराठी संस्कृती यांचे तत्कालीन जीवनदर्शन संतसाहित्यात दिसते. संतांच्या बाबतीत नेहमी म्हटले जाते, 'ज्ञानदेवें रचिला पाया तुका झालासे कळस'. ही उक्ती यथार्थ आहे.

## १.२ संतपरंपरेत संत तुकारामांचे स्थान:–

संत तुकारामांचे संपूर्ण नाव तुकाराम बोल्होबा मोरे (आंबिले). तुकोबांचे अभंग महाराष्ट्रातील अनेकांच्या अंत:करणात स्थिरावलेले आहेत. संत तुकारामांचे अभंग हे महाराष्ट्राचे अमूल्य असे वैचारिक धन आहे. तुकारामांचे अभंग व त्यांचे लौकिक जीवन अलग करता येत नाही. त्यांच्या प्रत्येक अभंगातून त्यांचा जीवनविषयक विचार व दृष्टिकोन व्यक्त होतो. जीवन जगताना सामान्य माणसाला येणारे सर्व अनुभव त्यांनी अनुभवले , जनजीवन न्याहाळले व त्या अनुभवांची मांडणी अभंगाद्वारे केली. लोकांच्या भाषेत बोलणारा एक संतकवी म्हणून संत तुकारामांची ओळख आहे. तुकोबांचे सुमारे पाच हजार अभंग उपलब्ध असून त्या अभंगांची सामाजिक आवाहकता सार्वकालिक अशी आहे. ''मराठी सारस्वतात तुकोबांच्या अभंगवाणीचे स्थान सर्वात वरचे असून ती सामान्यांच्या हृदयात जाऊन भिडली आहे''[१] संत तुकारामांच्या अभंगातून जीवनभाष्य केलेले आहे. महाराष्ट्राला सामाजिक नीतिमूल्यांची खऱ्या अर्थाने परखडपणे, स्पष्ट शब्दात शिकवण देणारे लोकशिक्षक म्हणून संत तुकारामांचा उल्लेख करणे यथोचित ठरेल. महाराष्ट्राच्या भागवत धर्माच्या मंदिराचा कळस म्हणून संत तुकारामांचा उल्लेख केला जातो. स्त्रीपुरुष, ग्रामीण नागर, शिक्षित – अशिक्षित, भाविक , वारकरी, बुध्दिवंत, कवी, समीक्षक अशा सर्वच लोकांनी तुकारामांच्या अभंगांचा गौरव केलेला आहे. 'तुकाराम हे प्राचीन मराठी साहित्यातील जवळजवळ अखेरचे प्रमुख वारकरी संत त्यांची कविता म्हणजे संत साहित्याचा कळसाध्याय म्हटला पाहिजे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, यांच्या सांस्कृतिक कार्याचा वीणा त्यांनी खांद्यावर घेतला. वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने तर तुकारामांचे कार्य फार मोलाचे आहे. वंशपरंपरेने चालत आलेली विठ्ठलभक्तीची मिरास त्यांनी वाढविली. स्त्री–शूद्रांपर्यंत पोचविली. नाममहिम्याने मोक्षाची पायवाट सोपी केली. आषाढी कार्तिकी पंढरीची वारी करणाऱ्या भागवंताचा अभिमान वाहिला.''[२] त्यांच्या अभंगातून त्यांची विविध रूपे दिसतात. संत कवी, तत्वचिंतक, समाजप्रबोधनकार, लोकशिक्षक अशी विविध रूपे त्यांच्या



328

Screenshot_2018-04-30-12-24-46.png

रूपे दिसतात. संत कवी, तत्वचिंतक, समाजप्रबोधनकार, लोकशिक्षक अशी विविध रूपे त्यांच्या



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *
Dr. Babasaheb Ambedkar Mah... Aundh, Pune-67



अभंगातून डोकावतात. 'बुडती हे जन देखवेना डोळा, म्हणूनिया येतो कळवळा' या भावनेतून त्यांनी समाजाला कळकळीने उपदेश केलेला आहे. संत तुकारामांच्या वाणीचा व अभंगांचा प्रभाव समाजमनावर मोठया प्रमाणावर पडलेला आजही दिसून येतो. भागवत संप्रदायाचा इतिहास बहेणाबाईनी एका अभंगातून सांगितलेला आहे.

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले हे आवार ॥
जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ॥
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥
बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केलें वोजा ॥

बहेणाबाईनी सर्व संतांच्या कार्याचा यथोचित गौरव वरील अभंगातून केलेला आहे. वारकरी मंदिराचा कळस म्हणून संत तुकारामांचा उल्लेख केलेला आहे.

**१.३ संत तुकारामांच्या अभंगातील बुवाबाजीचे चित्रण :–**

संत परंपरेत एक सडेतोड भूमिका घेऊन तत्कालीन समाजव्यवस्थेवर, कर्मकांडावर, बुवाबाजीवर, अंधश्रध्दांवर असूड ओढणारा एक लोकशिक्षक संतकवी म्हणून संत तुकारामांचा उल्लेख करणे महत्वपूर्ण ठरेल. कसलीही भीडभाड न ठेवता आपल्या विचारावर ठाम राहून समाजोध्दाराची भूमिका घेऊन संत तुकारामांनी मानवतावादी भूमिकेतून अभंगरचना केलेली आहे. जीवन जगताना कोणीही उच्च नाही व कोणीही कनिष्ठ नाही, 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ.' अशी स्पष्ट भूमिका संत तुकारामांनी घेतलेली होती.

आचारभ्रष्ट समाज, नीतिमूल्यांची पायमल्ली, विपरित कौटुंबिक नाती, भयावह समाजजीवन, पोटभरू कथाकार, वाढती भोंदूगिरी व बुवाबाजी, अंधश्रध्दा व कर्मकांड या सर्वच बाबींवर संत तुकारामांनी आपल्या अभंगातून सडेतोड विचार मांडलेले आहे. एक लोकउध्दारक संत म्हणून त्यांची ओळख त्यांच्या अभंगरचनेतून होते. तत्कालीन समाजव्यवस्था विपरित झाली होती. लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन लोकांना लुबाडणाऱ्या भोंदुबाबांची संख्या वाढत चालली होती. अशा भोंदूगिरीचा पर्दाफाश तुकारामांनी अनेक अभंगातून केलेला आहे.

" लांब लांब जटा काय वाढवूनि । बावडे घेऊनि कोंभे चाले ।१ ॥
खायाचा बोळमा शिव्या दे जनाला । ऐशा तापशाला बोध कैंचा ।धृ ॥
सेवी भांग अफू तमाखू उदंड । परि तो अखंड भ्रांतीमाजी ॥२ ॥
तुका म्हणे ऐसा सर्वस्वे बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग ॥३ ॥ (अभंग क्र. २७७७)
सदा सर्वकाळ अंतरी कुटील । तेणे गळां माळ घालूं नये ।१ ॥
ज्यासी नाही दया क्षमा शांती । तेणे अंगी विभूती लावू नये ।धृ ॥(अभंग क्र. २७७९.)

समाजातील वरीलप्रमाणे वर्णन केलेल्या बुवांना स्पष्टपणे तुकारामांनी बजावले आहे की, जटा वाढवून कोंभी, तापशी व जनाला शिव्या देणारा, अफू , भांग, तमाखू खाणारा, मनाने कुटिल असणारा, ज्याच्या अंगी दया क्षमा शांती नाही अशा लोकांनी हरीभक्ती करू नये व अंगाला विभूती लावू नये अशी स्पष्ट भूमिका संत तुकारामांची आहे.

'गाजराची पुंगी । तैसे नवे जाले योगी ।१ ॥
काय करोनि पठन । केली अहंता जतन ।धृ ॥
अल्प असे ज्ञान । अंगी ताठा अभिमान" (अभंग क्र.२८४४)

अल्प अशा ज्ञानाचा अभिमान बाळगणारे लोक संत होऊ शकतात का? अशा लोकांचे ' हाणोनी फोडा तोंड" असे संत तुकाराम म्हणतात.



329

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Vidyawarta® February 2018 Special Issue 079

समाजाला सन्मार्ग दाखविणे हेच खरे प्रमुख कार्य संतांचे आहे. परंतु व्यसनाच्या आहारी गेलेले बुवा समाजाला काय ज्ञान देणार? तेथे पांडुरंग कसा भेटणार? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

" ऐसे संत झाले कळी । तोंडी तमाखूची नळी ॥१॥
स्नानसंध्या बुडविली । पुढे भांग वोडवली ॥ध्रु॥
भांगभुर्का हे साधन । पची पडे मद्यपान ॥२॥
तुका म्हणे अवघे सोंग । तेथे कैचा पांडुरंग ॥३॥ (अभंग क्र. २८४७)

श्वान भगवे असले म्हणून त्याच्याकडे ज्ञान असेल का? अन जटा वाढविल्या म्हणून संत होता येते का ? याची विचारणा संत तुकारामांनी पुढील अभंगातून केलेली आहे.

" भगवे तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथे अनुभवाचा काय पंथ ॥१॥
वाढवुनी जटा फिरे दाही दिशा । तरी जंबुकेषा सहज स्थिती ॥ध्रु॥
कोरोनिया भूमी करिती मधीं वास । तरी उंदरास काय वाणी॥२॥
तुका म्हणे कासया करावे । देहासी दंडावे वाउगें चि ॥३॥ (अभंग क्र. ३८५२)

असे वर्तन न करता खऱ्या अर्थाने , मनाने ईश्वराची भक्ती करावी असा उपदेश ते करतात. भगवी वस्त्रे घालून कोणी संन्यासी होत नाही, त्यांना विषयवासना सुटत नाही, कदान्नापेक्षा चांगले अन्न त्यांना खावे वाटते, इतरांनी आपला मान राखावा , जटा लांबवून सर्वांगाला विभूती लावून , पोट भरण्यासाठी नवेनवे उपाय शोधणारे हे ढोंगी साधू 'तुका म्हणे जाय नर्क लोका' असेही स्पष्टपणे बजावतात. संतचिन्हे अंगी घालूनी व तुलसेच जगात भूषण मिरवणारे, वरवर विरक्ती दाखविणारे परंतु काम, क्रोध, लोभ स्थिती असणारे भोंदू जगाला नेहमीच फसवत राहतात अनेक कथेकरी आजही मोठ्या प्रमाणात पैसे घेऊन कीर्तन करतात. 'मोल घेउनियां कथा जरी करी । तरी मंगो हरी देह माझा।' असे तुकाराम म्हणतात. पांडुरंगाच्या कृपेनेच मी कथाकिर्तन करतो आणखी मला काय हवे? असा प्रश्नही ते विचारतात. अंगात विविध देवदेवतांचे वारे येणाऱ्या भोंदूनाही संत तुकारामांनी फटकारलेले आहे.

" अंगी घेऊनिया वारें दया देती । तया भक्ता हाती चोट आहे ॥१॥
देव्हारा बैसोनि हालविती सुपें । तेसी पापी पापें स्थिरावली ॥ध्रु॥
एकीबेकीन्यायें होतसे प्रचित । तेणें लोक समस्त भुलताती ॥२॥
तयाचे स्वाधीन दैवतें असती । तरी कां मरती त्यांची पोरें ॥३॥
तुका म्हणे पाणी अंगारा जयाचा । भक्त कान्होबाचा तो ही नव्हे ॥(अभंग क्र. ४२५५)

अंगात दैवतांचे वारे येणारे लोक इतरांना फसवितात, भुलवितात, त्यांना जर दैवते अधीन झाली आहेत तर मग त्यांची मुले कशी काय मृत्यू पावतात असा मार्मिक प्रश्न वरील अभंगातून संत तुकारामांनी विचारला आहे.

तत्कालीन समाजात भोंदूगिरी करणाऱ्यांची संख्या मोठी होती. या भोंदूगिरी करणाऱ्या बुवांवर अनेक अभंगातून संत तुकारामांनी असूड ओढलेले आहेत.

" ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करोनी म्हणती साधु ॥१॥
अंगा लावूनिया राख । डोळे झांकुनि करिती पाप ॥ध्रु॥
दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ॥२॥
तुका म्हणे सांगू किती । जळो तयांची संगती ॥३॥ (अभंग क्र.४२८७)

संत तुकारामांच्या काळात फसविणाऱ्या भोंदूबुवांची संख्या जशी अधिक होती तसेच भोंदूबाबा आजही मोठ्या संख्येने आहेत. अशा भोंदूबाबांची सेवा लोकांनी करू नये. 'तिर्थी धोंडा पाणी देव रोकडा सज्जनी' असेही ते स्पष्ट करतात. खरा साधू कोणता ? ज्याला गर्व नाही अभिमान नाही व ज्याच्या ठायी समाजउद्धाराची तळमळ आहे. 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले'.



330

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No. 62759 Vidyawarta® February 2018 Special Issue 080

नांचि साधु ओळखावा , देव तेथेंचि जाणावा' अशी साधुंची व्याख्याच जणू संत तुकारामांनी अतिशय सोप्या शब्दात केलेली आहे. भिक्षापात्र हाती घेणे म्हणे लाजीरवाणे जीणे अशा जगण्याचा त्यांनी धिक्कार केलेला आहे. वर वर भक्तिभाव ठेवून देव कधी भेटत नाही. अशा भोंदू लोकांची संगती मानवाला अधोगतीस नेल्याशिवाय राहणार नाही. साधुंने सुद्धा चांगल्या संगतीतच रहावे. 'ठेकणाचे संगे हिरा जो भंगला, कुसंगे नाडला तैसा साधू' अशी गत त्याची होईल. सिंहस्थपर्वणीतील भोंदूगिरीबद्दलही तुकारामांनी 'आली सिंहस्थपर्वणी न्हाव्या भटा जाली धणी' असे म्हटलेले आहे. स्नान केलं म्हणजे अवगुण कमी झालं का? वर्तनात सुधारणा झाली का? असे प्रश्न तुकोबांनी विचारले आहे.

समाजात सर्वच भोंदूसाधु नाहीत तर काही अंतर्बाह्य निर्मळ मनाचे साधूही आहेत. पण त्या साधुंना समाजात ओळखले जात नाही. काही लोक या ईश्वरभक्तांचा उपहास करतात. त्याविषयी संत तुकाराम म्हणतात,

" नाही देवाचा विश्वास । करी संतांचा उपहास ॥१॥
त्याचे तोंडी पडे माती । हीन शूकराची जाती ॥ध्रु॥ (अभंग क्र. ३५७०)

बुवाबाजीचे चित्रण करणारे तुकारामांचे अभंग आजच्या परिस्थितीवर भाष्य करतात. "समाजाच्या भौतिक कल्याणासाठी सदाचाराच्या आणि नीरक्षीर न्यायाने लोकांसमोर तत्त्वज्ञान मांडणारा तुकाराम हा संतमालिकेतील एकमेव तत्त्वचिंतक आहे"[3] लोकांनी अंधश्रद्धा व भोंदूगिरी यापासून दूर राहून कार्यकारणभाव जाणून घ्यावा अशी कळकळीची तळमळ व्यक्त करणारा पहिला विवेकवादी व विज्ञानवादी संत म्हणून संत तुकारामांचा उल्लेख करता येईल.

**१.४ बुवाबाजीचे चित्रण करणारे अभंग :— काही निष्कर्ष —**

१. सतराव्या शतकात कर्मकांड, बुवाबाजी, अंधश्रद्धा समाजात मोठ्या प्रमाणात पसरल्या होत्या. अशा अंधारमय परिस्थितीत सद्विवेकाची मशाल हाती घेऊन विज्ञानवादी दृष्टिकोन समाजात रुजविण्याचा प्रयत्न संत तुकारामांनी केलेला आहे.

२. संत तुकाराम 'लोकांनी सन्मार्गानेच वाटचाल करावी' यावर ठाम आहेत.

३. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही , मानियेले नाही बहुमता अशा निर्धार' त्यांच्या विचारातून व्यक्त होतो.

४. भोंदूगिरी करणाऱ्या लोकांवर कठोर भाषेत त्यांनी टीका केलेली आहे. त्यांच्या वर्तनावर आसूड ओढलेले आहेत.

५. 'वरपांगी भक्ती असणारे, इतरांना लुबाडणारे , जीवनाचा खरा अर्थ माहीत नसणारे' अशा व्यक्तींना त्यांनी शब्दांचे फटकारे मारले आहेत.

६. ढोंगी साधूंच्या मागे समाजाने लागू नये अशी कळकळीची विनंती संत तुकाराम करतात.

७. दांभिकतेवर टीका करताना संत तुकारामांच्या वाणीला एक वेगळीच धार आलेली आहे.

८. सत्प्रवृत्ती व असत्प्रवृत्ती यामध्ये नेहमीच संघर्ष चालूच असतो. ज्ञानी माणसाला या प्रवृत्तींचा प्रकार विवेकाने ओळखता आला पाहिजे.

९. बुवाबाजीचे चित्रण करणाऱ्या अनेक अभंगातून संत तुकारामांचा अंधश्रद्धांना किती कठोर विरोध आहे? हे समजते.

१०. देव माणसात असतो, दीनदुबळ्यात असतो. निस्वार्थी भावनेतून समाजाची सेवा करावी अशी भावना संत तुकाराम व्यक्त करतात.

**१.५ समारोप :—**



331

विरोध आहे? हे समजते.

१०. देव माणसात असतो, दीनदुबळ्यात असतो. निस्वार्थी भावनेतून समाजाची सेवा करावी अशी भावना संत तुकाराम व्यक्त करतात.

**१.५ समारोप :—**



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | UGC Approved Sr.No. 62759 | Vidyawarta® | February 2018 Special Issue | 081

संत तुकारामांना 'जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज' या उपाधीने गौरविले जाते. आपल्या अभंगातून जनहिताचीच चर्चा त्यांनी केलेली आहे. समाजाने अंधश्रध्दा, बुवाबाजी यांपासून दूर रहावे यासाठी तळमळणारा संत म्हणजे संत तुकाराम होय. ''बोले तैसा चाले त्याची वंदीन पावले'' या उक्तीचा प्रत्यय संत तुकारामांच्या अभंगातून येतो आजच्या परिस्थितीतही संत तुकारामांच्या विचारांची नितांत आवश्यकता आहे.

**संदर्भ टीपा :—**


१. ल.रा. नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,' फडके प्रकाशन, कोल्हापूर, नववी व संस्कारित आवृत्ती , २००६ , पृ. १५१.

२. उनि., नसिराबादकर , पृ. १५८.

३. डॉ. किशोर सानप , प्रा. मनोज तायडे, 'तुकाराम व्यक्तित्त्व आणि कवित्व,' लोकवाङ्मय गृह मुंबई , तृ.आ. १९९८ पृ. ३१

**साधनग्रंथ** :— जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज यांच्या अभंगांचा गाथा, प्रकाशक— विश्वस्त मंडळ श्री विठोबा रखुमाई देवस्थान संस्थान श्रीक्षेत्र देहू पुणे. प्रथम आवृत्ती २०००




332

# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume V | ISSN : 2394-207X (Print) | February 2018
Issue II | IMPACT FACTOR : 4.205

A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

IJMMS

Cosmos

Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

www.ijmms.in | Email : ijmms1...

Scanned by CamScanner

333

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

VOLUME-V, ISSUE-II

ISSN (Print): 2394-207X
IMPACT FACTOR: 4.205

INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

IJMMS

# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

## UGC Approved Research Journal (Sr. 47674)

**Editors: Dr. V. H. Mane, Prof. M. P. Shaikh**

**Language: Multilingual**

**Published by**

**INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES**

**Sneh Apartment,
Flat No. 001, Samarth Nagar, New Sangvi,
Pune- 411027**

**Copyrights: Editors 2014**

**All rights reserved**

**ISSN: 2394-207X (Print)
IMPACT FACTOR: 4.205**

**VOLUME-V, ISSUE-II**

**February -2018**

Scanned by CamScanner

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune


| | | | |
|---|---|---|---|
| 29 | A Study of Agri-Tourism in Maharashtra | Dr. B. A. Waykar | 149-154 |
| 30 | The Challenges of Qualitative Research | Dr. Dipali More | 155-157 |
| 31 | Role of Sampling Method in Research Methodology | [1]Gholap K.S.<br>[2]Dr. Desai V.R.<br>[3]Dr. Lamdade B.B.<br>[4]Ganesh Shelke | 158-162 |
| 32 | Social Science Research in India: Basic Challenges | [1]Dr. Shrikant Fulsundar<br>[2]Dr. Harshad Laxman Jadhav | 163-166 |
| 33 | MGNREGA: It's Implication in India: A Overview | Dr.Langade Sunil Sambhaji | 167-171 |
| 34 | RESEARCH METHOD, METHODOLOGY;NUT & BOLT | Dr.R.R.Borude | 172-174 |
| 35 | META-ANALYSIS IN PSYCHOLOGICAL RESEARCH | Satish Surye | 175-176 |
| 36 | The Advantages of the Qualitative Research | Dr. Bhagyashree Athawale | 177-180 |
| 37 | Recent Trends in Systematic Study and Training of Sports Behaviour | Bedarkar P. Chandrakant | 181-183 |
| 38 | Factorial Design: | Walke S. B. | 184-188 |
| 39 | Emotional Intelligence and Mental Health of The Gender Study | Dr. Dilip Shivane | 189-197 |
| 40 | Anger and Emotional Intelligence among post graduate students | Kaustubh V. Yadav | 198-204 |
| 41 | Sources of Error in Application of Statistical Methods in Various Research Objectives- A Theoretical Description | [1]Dr. Vishal Ghule<br>[2]UmaimaLokhandwala | 205-207 |
| 42 | Ethical Issues in Behavioral sciences research | Dr. Walke S. B.[1]<br>Dr. Paneru U. P.[2] | 208-211 |
| 43 | Personality differences in Closed Prison Inmates and Non-Inmates | Jadhav G. G.[1]<br>Jadhav K. M.[2]<br>Mundada N. D.[3] | 212-216 |
| 44 | Comparative Study of Emotional Intelligence of Deaf and Hard of Hearing Children | Anil Paraste[1]<br>Prof. S.K. Paul[2]<br>Himani Upadhaya[3] | 217-221 |
| 45 | Study of Child Health in relation with Mothers Personality | [1]Parate Prem<br>[2]Bedarkar Pritamkumar | 222-226 |




Scanned by CamScanner

# Social Science Research in India: Basic Challenges

[1]Dr. Shrikant Fulsundar
Gramonnati Mandal's
Arts, Commerce & Science College, Narayangaon.
[2]Dr. Harshad Laxman Jadhav
Assistant Professor,Dept. of Economics
Rayat Shikshan Sanstha's, Dr. Babasaheb Ambedkar College Aundh, Pune.

**Introduction:**Social science research in India has had a chequered history. In India the development of social science research is directly an outcome of the processes of modern education, the setting-up of universities and the academic interests of Indian intellectuals in writing issues concerning the people of the country during the colonial period. In the pre-independence phase social science research was mostly university centric and after the independence of India many institutes of research came up which have also contributed towards the development of social science research. Today social science research in India has grown manifold and as of 2014, there are 677 universities in India with more than 500 departments of social sciences as per the latest statistics from the website of India's HRD ministry. Some NGOs and policy research initiatives have also produced specific development focused research products but generally do not have longer term interest in research and the quality of their research is not yet established. Finding out the major challenges of social science research in India is the theme of this article.

**Concept of Social Science & Social Science Research:** Before defining Social Science Research we should know about the concept of Social Science. Social Sciences may be defined as the discipline, which deal with humans in their social and behavioral references. Edwin, R. A. Selegnian (in the 1st chapter of Encyclopedia of Social Sciences) has defined Social Sciences as "those mental and cultural sciences, which deal with the activities of the individual as a member of a group". Social Sciences as we can observe now are of recent origin. The idea of Social Sciences developed from Philosophy and did many other branches of knowledge. What is now stated as Social Sciences was formerly known as „Social Discipline", but with the advancement of time, due to the distinctive achievements of the scientific method on our way of life, the term „Social Discipline" was taken over by the term „Social Sciences"2. Generally speaking, the Social Sciences like Sociology; Economics, Anthropology, History, Psychology, Political Science etc cannot be kept within the limitations of demarcated boundaries. This is because; every human activity is a multifaceted activity. Therefore the Social Sciences overlap other disciplines and also relates to Natural and Human Sciences along with the Arts. In totality, Social Sciences study the structure and properties of human groups, the way of individuals interact with one another and within other environmental groups. When we talk about Social Science Research, it means, research conducted by social scientists following a systematic plan. Social Science Research refers to any scientific study of human action and interaction focusing on elements of thought and behavior that are in some sense social3. Social scientists employ a range of methods in order to analyze a vast breadth of social phenomena. Social Science Research concerned with a systematic



Scanned by CamScanner
336

ISSN 2278-5914

# Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara

(Inst. Reg. No. Maharashtra/13482/Satara/2010)

Research Booklet

# SANSHODHAN

# संशोधन



प्रतिसरकारचे अर्ध्वयू-क्रांतिसिंह नाना पाटील

**१९४२ चे चलेजाव आंदोलन : अमृत महोत्सवी वर्ष**

337

## प्राचिन विभाग

१७. कोंढणे/कोंडाणे बौध्द लेणीचा ऐतिहासीक अभ्यास
डॉ.भानुदास धोंडिबा शिंदे ४७

१८. कोकणचा प्राचीन इतिहास आणि राजवटी
डॉ.मंजुश्री शिवाजीराव घोरपडे ४९

१९. सातवाहन व पल्लव राजघराणे– दक्षिण भारतातील वैभवशाली साम्राज्ये
प्रा.के.एस.शिंदे ५३

२०. प्राचीनकालीन दक्षिण भारतातील राजघराणी
प्रा.लक्ष्मी भिमराव करजगे ५५

## मध्ययुगीन विभाग

२१. मोहोळ तालुक्यातील ऐतिहासिक स्मारके
डॉ.स्वराली चंद्रकांत कुलकर्णी ५८

२२. A Brief History of Bidri Art
**Dr. Nalini Avinash Waghmare** ६१

२३. छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीतील नाशिक, बागलाण, खानदेश भागातील मोगल –मराठा संघर्ष
प्रा.डॉ.शिवाजी वाघमोडे ६४

२४. मोगल मराठा संर्घषात सेनापती जुल्फिकारखान याची भूमिका
प्रा. सुप्रिया संग्राम पवार
[redacted] [redacted]

२५. माधवराव पेशवे व निजाम मैत्री संबंधाचे महत्त्व
प्रा.आर.बी.सातपुते ७०

२६ ब्रह्मेंद्रस्वामीची मराठ्यांच्या राजकारणातील भूमिका
प्रा.सौ.वंदना रामचंद्र लोंढे ७३

२७. चंदगड तालुक्यातील गड किल्ले : एक ऐतिहासिक अभ्यास
डॉ.मनोहर सुबराव कोळसेकर ७५

२८. लिंब गावातील मध्ययुगीन कालखंडातील कला व स्थापत्य
अनिता आगाशे ७८

२९. तारीखे सिकंदरी या ऐतिहासिक ग्रंथाचे सिंहावलोकन
अमृत साळुंखे ८१

३०. मध्ययुगीन किल्ले धारूरचे संरक्षण स्थापत्य
संतोष बाबुराव शिंदे ८४

३१. खंडाळा येथील पेशवेकालीन बारव व त्यावरील अप्रकाशित शिलालेख
प्रा. गौतम गणपती काटकर ८६

338

# २४. मोगल मराठा संर्घषात सेनापती जुल्फिकारखान याची भूमिका


प्रा. सुप्रिया संग्राम पवार
प्रा.किरण गणपत कुंभार
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध, पुणे.


**प्रस्तावना :** संपूर्ण हिंदूस्तान आपल्या वर्चस्वाखाली आला पहिजे असे स्वप्न बाळगून छ.शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर मराठा सत्ता नष्ट करण्यासाठी औरंगजेब बादशहा मोठी फौज घेऊन दक्षिण स्वारीवर निघाला. दिनांक १३ नोव्हेंबर १६८१ रोजी बुऱ्हाणपूर गाठले व दि. २२ मार्च १६८२ रोजी तो औरंगाबादेस येवून पोहचला.[१] औरंगजेबाने वयाची २६ वर्षे मोठ्या जिद्दीने मराठी सत्ता नष्ट करण्यासाठी या दक्षिणेत घालविली. परंतु मराठ्यांच्या चिवट प्रतिकारा समोर औरंगजेब निष्प्रभ ठरला. मराठी सत्तेचे थडगे बांधण्यासाठी महाराष्ट्रात आलेल्या या बादशहाचा मराठेशाहीशी लढता लढता करूनाजनक अंत झाला व त्याचेच थडगे महाराष्ट्रात बांधले गेले. या मोगल मराठा संर्घषाचा विचार आपणास दोन आधाड्यांच्या आधारे करता येतो १) लष्करी डावपेच २) राजकीय डावपेच या दोन्ही आघाड्यांवर लढणारे मोगल व मराठे यांच्यामधील काही धुरंदर होते त्या पैकी च एक जुल्फिकारखानबहादूर. जुल्फिकार खान औरंगजेबाचा एक उत्तम सेनापती होता. त्याने मोगल मराठा संघर्षात कोणती भूमिका पार पाडली व त्याचे काय परिणाम झाले याचा शोध प्रस्तुत शोध निबंधात घेण्यात येणार आहे.

**मोगल मराठा संर्घषातील मोगलांचे प्रमुख सरदार :** औरंगजेब दक्षिण स्वारीवर निघाला त्या वेळी त्याने आपल्या बरोबर मोगल खजिना तर घेतलाच व त्याच बरोबर मातब्बर असे सरदार ही या मोहिमेत सामिल करून घेतले मोगल दरबारातील बातमी पत्रातील उल्लेखानुसार दक्षिणेतील मोहिमेतील सूत्रे १६८१ पासून १७०७ पार्यंत औरंगजेब हा स्वतः चालवीत होता. या युध्दात सरसेनापती तोच होता. त्यामुळे त्याच्या सेनापतींना स्वतंत्र मोहिमा काढून, धोरणे आखून, युध्दे करणे आगर राजकारणे खेळून स्वतःची कर्तबगारी दाखविण्यास वाव नव्हता. तरी पण त्यातल्यात्यात बराच अधिकार गाजविणारे सेनापती म्हणजे बेदरबख्त, जुल्फिकारखान व गाजिउद्दीन फीरोजजंग हे दिसतात. त्यांच्या खालोखाल कर्नाटकात दाऊदखान पन्नी व कोकणात मातबरखान यांची नावे घ्यावी लागतील.[२]

**जुल्फिकारखान याचा पूर्व परिचय :** जुल्फिकारखान याचा जन्म १६५७ मध्ये झाला. याचे मुळ नाव एहिकादखानअसे होते. याचे पिता आसदखान औरंगजेब बादशहाचे दिवान असल्यामुळे जुल्फिकारखान बादशहाचा अत्यंत निकटवर्तीयाच्यातला बनला.[३] घरातूनच जुल्फिकारखानास राजकरणाचे व लष्करी डावपेचाचे धडे मिळाले. याचाच फायदा त्याने दक्षिणेत मराठ्यांविरोधात केला व औरंगजेबाचे मनसुबे काही अंशी पूर्ण केले.

**मोगल मराठा संर्घषात सेनापती जुल्फिकारखान याला मिळालेले यश–रायगडाचा पाडाव :** आदिलशाही व कुतुबशाही यांचा विध्वंश करून औरंगजेबाने आपले लक्ष मराठ्यांकडे केंद्रित केले आणि आपला विश्वासू सेनापती जुल्फिकारखान याच्यावर मराठ्यांना रोखण्याची जबाबदारी सोपवली. जुल्फिकारखानाच्या नेतृत्वाखाली मोगलांच्या हालचालीना वेग आला. मोगलांनी रायगडाच्या आसपासचे किल्ले जिंकून मराठ्यांची नाकेबंदी केली. शहजादा आज्जम याजकडून हवी ती मदत घेवून किल्ला जिंकून घ्यावा अशी.बादशहाने जुल्फिकारखानास आज्ञा केली.[४] त्याच दरम्यान ५ एप्रिल १६८९ रोजी छ.राजाराम महाराज रायगडावरून निसटले आणि थेट जिंजीची वाट धरली. परंतु रायगडावर शिवाजी दुसर (शाहू)आणि येसुबाई व इतर राज परिवारातले सदस्य उपस्थित आहे ही वार्ता समजताच औरंगजेबाने जुल्फिकारखानास रायगडचा पाडाव करण्याचे आदेश दिले. तेव्हा जुल्फिकारखानाने मोर्चे लावले. गडावरील मंडळीनी १० महिने किल्ला लढविला परंतु कोणताही पर्याय शिल्लक नव्हता. तेव्ह जुल्फिकारखानाबरोबर वाटाघाटी करून आपणास कोणता दगा फटका होणार नाही या आश्वासनावर दि.६ नोव्हेंबर १६८९ रोजी येसूबाईने रायगड मोगलांच्या ताब्यात दिला.[५] जुल्फिकारखानाच्या या कामगिरीवर खुष होवून औरंगजेब बादशहाने एहिकादखान याला जुल्फिकारखान ही पदवी दिली.[६]

**जिंजीचा पडाव :** छ.राजारामाचा पूर्ण बिमोड केल्याशिवाय मराठा मुलूख आपल्या ताब्यात येणार नाही याची जाणीव औरगजेबाला झाले होती. त्यामुळे त्याने जुल्फिकारखानास कोणत्याही परिस्थितीत जिंजीचा किल्ला फत्ते करून राजारामाचे पारिपत्य करावे असा आदेश दिला जुल्फिकारखानानेही जिंजीचा वेढा कडक केला. परंतु या वेढ्यातूनही छं.राजाराम महाराज २६ दिसेंबर १६९७ रोजी सुखरूप बाहेर पडले आणि नंत जुल्फिकारखानाने जिंजी जिंकून घेतली.[७]

**मराठ्यांच्या काही प्रमुख सरदारांचा पराभव :** दक्षिणेतील मोगल मराठा संर्घषात जुल्फिकारखानाने मराठ्यांच्या प्रमुख सेनानीचा बऱ्याच वेळा पराभव केला त्यातील काही महत्वाच्या लढायांचा इथे उल्लेख केला आहे.

**मराठा सेनापती संताजी घोरपडे यांचा पराभव :** मोगलदरबारातील बातमीपत्रानुसार 'जुल्फिकारखान बहादूर याच्या फौजेतून कळले कं संताजी हा तंजावरकडे गेला ही बातमी कळताच जुल्फिकारखान हा सैन्य घेऊन संताजीवर चालून गेला. युध्द झाले. बादशहाच्या भाग्याने शत्रू

क लेक प्राणास मुकले. शत्रूचा पराजय झाला. घोडे, उंट, भाले व तलवारी अशी लूट सापडली'.[८]

**मराठा सेनापती धनाजी जाधव यांचा पराभव :** मोगल दरबारातील बातमीपत्रानुसार 'काल रात्री हरकऱ्याच्या तोडून पुढीलप्रमाणे कळले. धनाजी जाधव, हणमंतराव, राणोजी वगैरे मराठे सरदार हे पंधर हजार स्वारांचे सैन्य घेऊन रहिमतपूरच्या पलीकडे आले. ही बातमी कळताच जुल्फिकारखान हा सैन्य घेऊन मसूरच्या ठण्यावरून निघाला. त्याचे व गनिमांचे युध्द झाले. बाण व बंदुका यांचा मारा झाला. नंतर जुल्फिकारखानाने मराठ्यांवर हल्ला चढविला. शत्रूपैकी अनेक जण ठार झाले. शत्रू पैकी पाचशे माणसे मारण्यात आली घोडे, भाले व इतरही शस्त्रे मोगलांच्या हाती पडली'.[९]

**रामचंद्रपंत अमात्यचा पाडाव :** मोगल दरबारातील बातमीपत्रानुसार 'राजारामाचा कारभारी रामचंद्र हा धान्याची रसद, दोन हजार पायदळ, बंदूकची बरोबर घेऊन पन्हाळगडापाशी आला. जुल्फिकारखान बहादूर याने त्वरा करून त्याच्याशी युध्द केले. शत्रू पैकी अणेक जण मारले गेले. धान्याची रसद लुटण्यात आली. शत्रूपैकी काही जण पळून किल्ल्यात गेले'.[१०]

**जुल्फिकारखान मीरबक्षी मिळते :** मोगल दरबारातील बातमी पत्रातील नोंदीवरून समजतेकी 'दि.५ नोव्हेंबर १७०२ रोजी इंदापूर दिर्घ आजारानंतर बख्शीउल्मुरक बहरामंद खान याचा मृत्यु झाल्यावर बख्शीउल्मुल्क मीर बक्षी म्हणून जुल्फिकारखान याची नेमणूक केली जाते'.[११]

**जुल्फिकारखान आणि शाहू :** जुल्फिकारखानाचे शाहूशी संबंध कसे होते याची नोंद मोगल दरबारातील बातमी पत्रात उपलब्ध आहे. '७ ऑक्टोबर १७०३ काल बादशहाना कळविण्यात आले की, राजा शाहू हा बादशहाच्या आज्ञेप्रमाणे जुल्फिकारखानाच्या डेऱ्यावर गेला होता. जुल्फिकारखानाने त्याला एक घोडा व एक खंजीर या वस्तू आपल्या तर्फे भेट दिल्या त्यानंतर त्याने राज शाहूला स्वतःच्या डेऱ्याकडे जाण्यासाठी निरोप दिला'.[१२]

**शाहूची सुटका :** औरंगजेब बादशहाचा मृत्यु २० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगाबाद येथे झाल्यावर मोगल युवराज आज्जमशहा याने स्वतःस बादशहा म्हणून घोषीत केले आणि आपला भाऊ शहा आलम याचा विरोध मोडून काढण्यासाठी तो उत्तरेस निघाला. शाहू व सर्व राजपरिवार त्या वेळेस उत्तरेच्या मार्गावर होते. मराठयांपासून शांती लाभावी व त्यांची शक्ती कमी होऊन दुफळी माजावी या हेतूने जुल्फिकारखान व इतर मुत्सद्दी यांच्याशी सल्लामसलत करून उत्तरेस जात असताना दोराहजवळ ८ मे १७०७ राजी शाहूची मुक्तता केली.[१३]

आज्जमशहा एवढ्या सहजासहजी शाहूची मुक्तता करेल असे होणे शक्य नव्हते. आज्जमशहाने सुटका करते समयी शाहूस काही अटी मान्य करायला लावल्या होत्या. त्या पुढील प्रमाणे १)शाहूने आपल्या राज्याचा बंदोबस्त करून पादशाही प्रदेशास उपद्रव करणाऱ्यांचा बिमोड करावा. २) आज्जमशहा तख्तनशीन झाल्यानंतर सहा सुभ्याची सरदेशमुखी व चौथाईच्या सनदा देईल. ३) जेव्हा बादशहास गरज पडेल तेव्हा ससैन्य बादशहाच्या मदतीस जावे.[१४] शाहूची सुटका जरी काही अटींवर झाली असली तरी त्यामागील राजकारण नमूद करताना तत्कालीन इतिहासकार खाफिखान व भिमसेन सक्सेना यांची मते पुढील प्रमाणे खाफिखान लिहतो ''शिवाजीचा नातू शाहू याज बरोबर जुल्फिकारखानाचे खास आणि घनिष्ट संबंध होते. पूर्वी पासूनच तो शाहूच्या सर्व कारभाराकडे आस्थापूर्वक लक्ष देत असे''. तर भिमसेन सक्सेना लिहतो ''संभाजीचा मुलगा राजा शाहूला आलमगीर बादशहाच्या कारकिर्दीत नजर कैदेत ठेवण्यात आले होते. त्याला नंतर जुल्फिकारखानाच्या हवाली करण्यात आले होते. त्याला उघड उघड निरोप देणे हे इष्ट वाटले नाही. म्हणून आलीजहाच्या इशाऱ्याने राजा शाहू हा काही सहकाऱ्यांना बरोबर घेऊन दोराहाजवळ मोगल छावणी होती तेथून पळाला. त्याने दक्षिणेची वाट धरली''.[१५]

समारोप : औरंगजेब दक्षिण भारताला जिंकण्याच्या उद्देशाने आला होता त्यापैकी आदिलशाही व कुतुबशाही नष्ट केली, मराठ्यांचा छत्रपती संभाजी याला ठार मारले, मराठ्यांची राजधानी रायगड व जिंजी जिंकून घेतल्या, मराठ्यांच्या युवराजास कैदेत टाकले एवढे यश मिळाले असले तरी त्याच्या हयातीत मराठ्यांचा त्याला पूर्ण नाश करता आला नाही. हे जे यश मिळाले त्या यशात जुल्फिकारखानाचे खुप मोठे योगदान आहे. जुल्फिकारखानाच्या या कामगिरीबद्दल सेतुमाधवराव पगडी हे आपल्या 'औरंगजेबाचा इतिहास' या ग्रंथात म्हणतात की ''या साऱ्या युध्दात दक्षिणेतील लोकांच्या आणि विशेषतः मराठ्यांच्या मनोवृत्तीचे विश्लेषण ज्याने केले होते आणि मनात असते तर जो या युध्दाला वेगळे वळण देऊ शकला असता असा एकच सेनापती औरंगजेबाच्या लष्करात होता आणि तो म्हणजे रायगड जिंकून देणारा मराठ्यांच्या भावी राजाला कैद करणारा जुल्फिकारखान नुश्रतजंग हा होय. मोगल मुलखावर सातत्याने हल्ला करणाऱ्या मराठ्यांच्या तुफानी टोळ्यांच्या पाठलागावर राहण्याची कामगिरी जुल्फिकारखानाकडे सोपविण्यात आली होती. त्याने ती कामगिरी किती यशस्वीपणे पार पाडली हे आपल्याला त्याच्या मराठ्यां बरोबर चाललेल्या युध्दातील अपराजित्वामुळे दिसून येते. मराठ्यांबरोबरच्या युध्दात त्याने मराठ्यांइतकेच साहस, चिकाटी, चपलाई इत्यादी सर्वंकष गुण प्रकट केले. या सर्व युध्दात एकदाही त्याचा पराभव मराठयांना करता आला नाही. या उलट मराठ्यांनाच बऱ्याच वेळा त्याच्या समोर माघार घ्यावी लागली.''[१६]

औरंगजेब बादशहाचा मृत्यु झाल्यावर नेतृत्वहिन मोगल सत्तेची राजकीय आणि लष्करी धोरणे संभाळण्याची जबाबदारी अनुभवी असलेल्या जुल्फिकारखानाने आपल्याकडे घेतल्याची दिसते. मोगल मराठा संघर्षात राजकीय डावपेच आणि लष्करी डावपेच यात दोन्ही बाजूंच्या मुत्सद्दी यांचा कस लागला मोगल मराठा संघर्षात मराठ्यांची सत्ता टिकून राहिली असली तरी शाहूच्या माध्यमातून जुल्फिकारखानाने जो मराठ्यांना कमकूवत करण्याचा जो डाव टाकला तो यशस्वी झाला. शाहूची सुटका झाल्यावर शाहू व ताराबाई यांच्यातील यादवी तसेच शाहू आणि बादशहा आज्जमशहा





Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

340

याच्या बरोबर झालेला करार यातून राजकीय डावपेचात मुघलांचा विजय झालेला दिसून येतो व या सर्व राजकारणात जुल्फिकारखानाची महत्वाची भूमिका होती. जुल्फिकारखानाच्या या चालीचे परिणाम म्हणजे जो मराठा मोगलांविरोधात संघटीत होवून लढला त्याच संघटनास शाहू तारबाई यांच्यातील यादवीने सुरूंग लागला. भविष्यात मराठा राज्याअंर्तगत जे कलह सुरू झाले त्याची ही सुरूवात होती. तसेच शाहू आणि बादशहा आज्जमशहा याच्या बरोबर झालेला करार हा देखील जुल्फिकारखानाच्या सल्ल्यानेच झाला असल्याने छ.शिवाजी महाराजांचे जे स्वराज्य सार्वभौम होते ते या कराराने मोगलांचे मांडलीक झाल्या सारखेच झाले. या सर्व कामगिरी मुळे जुल्फिकारखान मराठा मोगल संघर्षात लष्करी डावपेच आणि राजकीय डावपेच यात यशस्वी झाला.

**संदर्भ :**


१. देशपांडे प्रल्हाद नरहार, मराठ्ययांचा उदय व उत्कर्ष, मोघे प्रकाशन, पुणे,१९७५,पृ.१८०.
२. पगडी सेतुमाधवराव ( संपा आणि अनुवाद ), मोगल दरबारची बातमी पत्रे, खंड १, १६८५ ते १७०० महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई प्रकाशन, १९७८,पृ.२३.
३. हेरवाडकर रघुनाथ (संपा), थोरले शाहू महाराज यांचे चरित्र,व्हीनस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९७६, पृ.१५६.
४. पगडी सेतुमाधवराव,(संपा.), हिंदवी स्वराज्य आणि मोगल, व्हीनस प्रकाशन, पुणे,१९६६,पृ.९३.
५. मिराशी मिन, महाराणी येसुबाई, कॉन्टीनेंटल प्रकाशन,पुणे,१९९९,पृ.६४.
६. पगडी सेतुमाधवराव ( संपा आणि अनुवाद ), मोगल दरबारची बातमी पत्रे, खंड १, उपरोक्त, पृ.४६.
७. देशपांडे प्र.नं., उपरोक्त, पृ.२०२.
८. पगडी सेतुमाधवराव ( संपा आणि अनुवाद ), मोगल दरबारची बातमी पत्रे, खंड १, उपरोक्त,पृ.२०७.
९. कित्ता, पृ.१७९.
१०. पगडी सेतुमाधवराव ( संपा आणि अनुवाद ), मोगल दरबारची बातमी पत्रे, खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्रकाशन, १९७८, पृ.७६.
११. कित्ता, पृ १०.
१२. पगडी सेतुमाधवराव(संपा आणि अनुवाद), मोगल दरबारची बातमी पत्रे, खंड३,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई प्रकाशन, १९८९, पृ.१४४.
१३. कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह.,(संपा.), मराठ्यांचा इतिहास खंड २, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे,१९८५,पृ.२.
१४. भट भास्कर वामन, ऐतिहासिक लेखचर्चा, भा.इ.सं.मं.प्रकाशन, पृ.१५६.
१५. देशपांडे प्र.नं., उपरोक्त,पृ.२०२.
१६. सरकार जदुनाथ,(अनु.) कुर्टे भ.ग., औरंगजेबाचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई प्रकाशन, १९७८,पृ.१२,१३.


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67

K. G. Kumbhar.

ISSN-2250-0383
UGC Approved (SL NO. 2630)
Journal No. 48999
IMPACT FACTOR - 0.421

# SHODHANKAN

## STRATEGY OF WAR AND PSYCHOLOGY



- EDITORS -

Dr. Abhimanyu Dhormare

Dr. Ashok Kanade

| अ.क्र. | पेपरचे नांव | संशोधकाचे नांव | पांन नंबर |
|---|---|---|---|
| 18 | पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांचे परराष्ट्र धोरण : भारत आणि चीन संबंध | प्रा.संदिप नामदेवराव मिरे<br>प्रा.डॉ.हरी नारायण जमाले | 102 ते 107 |
| 19 | लष्करी सेवेमध्ये मानसशास्त्राची भुमिका | श्रीमती. सारिका क्षिरसागर | 108 ते 113 |
| 20 | गनिमी कावा – मानसशास्त्रीय युदधनिती | गडगे शांता रंगनाथ | 114 ते 119 |
| 21 | गनिमी कावा एक मानसशास्त्रीय युध्दतंत्र | प्रा. भोसले सुनिता विठ्ठलराव | 120 ते 124 |
| 22 | मराठा युद्धतंत्र गनिमी कावा याचा शत्रूवरील मानसशास्त्रीय प्रभाव | प्रा. डॉ. तानाजी हातेकर | 125 ते 128 |
| 23 | विविध विचारप्रवाह, बौध्दिक संघर्ष व सामाजिक उन्माद | विक्रांत व्यंकटराव भांके | 129 ते 135 |
| 24 | भातवडी युध्द आणि शहाजीराजे यांचा उदय | डॉ. विनोद सोनवणे | 136 ते 142 |
| 25 | पॅरिस शांतता परीषदेतील प्रमुख नेत्याच्या मनोवैज्ञानिक भुमिकेचे विश्लेषण | प्रा.डॉ.वाय.एस.माहुरे | 143 ते 151 |
| 26 | प्रचार: मानवी बुद्धीला संमोहित करणारे युद्धशस्त्र | प्रा.डॉ.अभिमन्यू ढोरमारे | 152 ते 163 |
| 27 | छत्रपती शिवाजी महाराजांची गनिमीकावा युध्द पध्दती | प्रा.झरेकर रमेश सोनू | 164 ते 170 |
| 28 | मध्ययुगीन बागलाणचे लष्करी महत्त्व | प्रा. संदीप भामरे | 171 ते 174 |
| 29 | भारतीय स्वातंत्र्यलढयातील जहाल मवाळ व क्रांतीकारकांची मानसिकता | सूरेखा काशिनाथ चेमटे | 175 ते 179 |
| 30 | सैनिकी मानसशास्त्र | डॉ.यु.एस.गायकवाड<br>डॉ.एम.डी.कानडे | 180 ते 185 |
| 31 | शिवकालीन युदधनिती | शितल अरविंद धरम | 186 ते 188 |
| 32 | 21 व्या शतकातील सायबर युध्द हॅकींग | प्रा. विशाल छबू पोटे | 189 ते 193 |
| 33 | छत्रपती शिवरायांची युध्दनिती व संरक्षण संघटना | डॉ. धम्मपाल रेवण माशाळकर | 194 ते 198 |
| 34 | युध्दजन्य परिस्थिती मध्ये सैनिकांना दिल्या जाणा–या आहाराचा चिकित्सक अभ्यास | दाभाडे वर्षा अंकुशराव | 199 ते 201 |
| 35 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या वक्रयुध्द पध्दतीचे महत्त्व | डॉ.प्रा. राधाकृष्ण जोशी | 202 ते 204 |
| 36 | डॉक्टर व शिक्षक यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास | चिंतामणी सुवर्णा बद्रिनाथ | 205 ते 211 |

ISSN NO. 2250-0383

# मराठा युद्धतंत्र गनिमी कावा याचा शत्रूवरील मानसशास्त्रीय प्रभाव

22

प्रा. डॉ. तानाजी हातेकर
प्रा.किरण कुंभार
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज,
औंध, पुणे–67

## प्रस्तावना

मराठ्यांच्या लष्करी इतिहासात 'गनिमीकावा' या युद्धतंत्राचे खूप महत्त्वाचे स्थान आहे. याच युद्धतंत्राचा अचूक वापर करुन छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले, त्याचे रक्षण केले आणि त्याचा विस्तार केला. म्हणूनच आज गनिमी कावा या युद्ध तंत्राचा अभ्यास वेगवेगळ्या सहाय्यकारी शास्त्रांच्या आधारे करून त्याचे महत्त्व व उपयोगिता अधोरेखित केली जाते. मराठ्यांनी महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेन या पद्धतीचा विकास केला.

संदर्भ साधनांच्या उपलब्धते शिवाय इतिहास लिहिता येत नाही आणि मानसशास्त्रीय विश्लेषण केल्याशिवाय गतकाळातील घटनांचा नेमका अर्थ काढता येत नाही उपलब्ध पुराव्यांचे परीक्षण करत असताना संशोधकांना त्यासंदर्भ साधनांचे वेग वेगळ्या मानसशास्त्रीय आणि वैज्ञानिकज्ञान शाखांच्या सिद्धांताचा वापर करावा लागतो म्हणून गतकाळातील युद्धशास्त्राचा आणि युद्धांचा अभ्यास करत असताना मानवशास्त्रीय सिद्धांत आणि मानसशास्त्राचा प्रभाव याची दखल संशोधकास घ्यावी लागते. मराठा युद्धतंत्राचा आणि त्यांच्या पराक्रमाचा शत्रूच्या मानसिकतेवर काय प्रभाव पडला होता याचा शोध घेत असताना तत्कालीन साहित्य कृती तून आणि पत्रव्यवहारातून अनेक संदर्भ निदर्शनास येतात. असाच उमराणीच्या युद्धा दरम्यान मराठ्यांच्या पराक्रमाचा शत्रूवर काय परिणाम जाणवतो याचे वर्णन त्याच वेळी निर्माण झालेल्या मुल्ला नुस्त्रती? कृत 'तारिखे इस्कंदरी या काव्य ग्रंथात आढळते.

**गनिमीकावा** "गनिम' हा शब्द मूळ फारशी आहे. मराठ्यांचे शत्रू मराठ्यांसाठी हा शब्दप्रयोग करत असत. तर कावा म्हणजे कपटाने केलेला हल्ला. हा एवढाच मर्यादित अर्थ नाही. कावा या शब्दाचा आणखी एक अर्थ म्हणजे वेगात असणाऱ्या घोडयास



344

ISSN NO. 2250-0383

वाटेल तसे फिरवते आणि शत्रूलाच कवादेत त्याच्यावर आघाडी घेणे. या डावपेचासाठी प्रशिक्षण आणि याची गरज असे. ''तसेच अचानक छापा घालून शत्रूची माणसे कापून काढणे, शत्रू सावध होण्यापूर्वी पळून जाणे, शत्रूची ठाणी आणि रसद लुटने, प्रदेश जाळून टाकणे यामुळे शत्रूची हाणी जास्त व आपली फार कमी होत असे यामुळे कमी सामर्थ्य असताना ही बलाढ्य शत्रूचा पराभव सहज शक्य होत असे.[2]

## मुल्लानुस्त्र ती आणि तारिखे इस्कंदरी

मुल्लानुस्त्र ती हा विजापूर येथील आदिलशहा राजघराण्यातील आठवा बादशहा अली आदिलशहा याच्या पदरी राजकवी होता. त्याचे तीन ग्रंथउपलब्ध आहेत.

1. तारिखेइस्कंदरी
2. गुल्शनेइष्क
3. अलीनामा

देवी सिंग चौव्हाण यानी मुल्लानुस्त्र ती याचे दक्खिनी हिंदीतील मूळ पुस्तकाचे हिंदी मध्ये संपादन केले आहे. प्रस्तुत काव्य ग्रंथ हा ऐतिहासिक असून त्यातील माहिती मुळे मराठे–आदिलशहा संबंधावर प्रकाश पडतो तारिखे इस्कंदरी याचा अर्थ 'सिकंदराचा इतिहास' हा काव्यग्रंथ पाच अध्याया मध्ये विभागला असून त्यामध्ये 38 श्लोक आहेत.[3]

## तारिखे इस्कंदरी मधीलवर्णन

या साहित्य कृतीमधून मराठ्यांच्या युद्धतंत्राचा आणि पराक्रमाचा शत्रूवर मानसशास्त्रीय प्रभाव कसा पडला आहे हे दाखविण्यासाठी निवडक काव्यपंक्तींचा समावेश केला आहे.

'न छे पेस जालग पवन कूंग जालवांतल गतिस के घोडयां की चाल।'19

अनुवाद–

''ज्या ठिकाणी हवेलाही प्रवेश मिळू शकत नाही तेथे शिवाजीचे घोडे जाऊन पोहचतात.''[4]

''जो जालग हैच लने कूंचिम्टी की झेल जनमप से उसके हशम काहे खेल।''20



345

तंत्राबाबत Psychological Operations in Guerrilla लागेलते जाते. गनिमी कावा युद्ध युद्धतंत्राबाबतपुढीलसंदर्भआढळतो. "The tactical effort in Warfare' या ग्रंथात या Guerrilla Warfare is directed at the Weaknesses of Parallel to a Psychological effort to Weak and destroy enemy Sociopolitical capacity at the same time. In Guerrilla Warfare more than in any other type of military efforts, the psychological activities should be simultaneous with the military ones, in order to achieve the objectives desired."

**निष्कर्ष–**

मुल्लानु स्त्रती शत्रूच्या दरबारातील लेखक असला तरी तो मराठ्यांच्या पराक्रमाची अप्रत्यक्ष कबुली देतो. मराठ्यांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या हालचालींचे वर्णन करताना तो अतिशयोक्ती पूर्ण वर्णन करतो. युद्धातील घडामोडींचे वर्णन करताना युद्धात सहभागी झालेल्या आदिलशाही सैन्याच्या अनुभवातून व त्यांच्या निराशेतून मुल्लानु स्त्रतीचे लिखान घडलेले दिसते व यातूनच शत्रूवर व त्यांच्या लेखकांवर युद्धातील घडामोडींचा मानसशास्त्रीय प्रभाव जाणवतो. सामर्थ्य असूनही मराठ्यांच्या युद्धतंत्रापुढे पराक्रमा पुढे विजापूरी सैन्य माघार घेते याचे विश्लेषण करताना शत्रूवरील मानसिक दडपण त्यांना आलेली निराशा व संपलेले मनोबल तारिखे इस्कंदरीतून स्पष्टपणे समोर येते.

**संदर्भ**


1. www. wikipedia.org.
2. पवार जयसिंगराव, शिवाजी व शिकाळ, फडके प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, 1997, पृ.क्र.248.
3. चौहान देवी सिंग, दक्खिनी हिंदीतील इतिहास व इतरलेख, इतिहास संशोधन मंडळ दादर प्रथमावृत्ती, 1973, पृ.क्र.77.
4. चौहान देवी सिंग (संपा.), मु. मा. जगताप (अनु.) तारिखे इस्कंदरी, महाराष्ट्र राष्ट्र भाषा सभा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1972, पृ.क्र.40.
5. किता, पृ.क्र.40.
6. किता, पृ.क्र.41.
7. किता, पृ.क्र.62.
8. किता, पृ.क्र.76.
9. M. George, Psychological Operations in Gaerrilla warfare, A. T. actial manual for the Revolutionary, first published by the central intellige NCE agency, p. 8.

# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTI DISCIPLINARY STUDIES

**Approved by : University Grant Commission (UGC)**

MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

www.irjms.in

E-mail : irjms2015@gmail.com irjms.in@gmail.com

Volume-IV Special Issue - I ISSN : 2454-8499 January 2018

Impact Factor : 1.3599(GIF), 0.679 (IIFS)


## SPECIAL ISSUE ON
## बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा



INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

IRJMS


Executive Editor
Prof. Tanaji Jadhav

Chief Editor
Dr. Mahendra Avaghade



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

348

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune 67

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Country/ State/City | Page No. |
|---|---|---|---|---|
| 1 | अत्रे यांच्या कथामधील सांस्कृतिक पर्यावरण | डॉ. जगदीश दिनकर शेवते | नसरापूर | 1 |
| 2 | सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी (ग्रामीण) कथा | बाळासाहेब शांताराम देविकर, डॉ. बाळकृष्ण लळीत | शिरूर | 4 |
| 3 | सांस्कृतीक पर्यावरण आणि मराठी कथा | प्रा.डॉ.रामीलाला सुदामराव पवार | तीर्थपुरी | 10 |
| 4 | विजया वाड यांच्या 'ऋणानुबंध' कथासंग्रहातील जेष्ठ नागरीकांचे प्रश्न | प्रा. डॉ. सौ. मंगल डोंगरे | नारायणगाव | 15 |
| 5 | बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा | प्रा. कांबळे विजया | पिरंगुट | 22 |
| 6 | मालवणी कथेतील स्त्री : सांस्कृतिक दर्शन | प्रा. डॉ. बाळकृष्ण रामचंद्र लळीत | शिरूर | 26 |
| 7 | 'सांस्कृतिक पर्यावरणातील घडामोडी आणि कथेतील वास्तव' | प्रा.डॉ.सुनील निगडे | वरवंड | 30 |
| 8 | सांस्कृतिक पर्यावरण आणि कथा : सहसंबंध | प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर | पुणे | 35 |
| 9 | सदानंद देशमुखांच्या कथेमधील बदलते सांस्कृतिक पर्यावरण | प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस | पुणे | 38 |
| 10 | बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि लेखकाची भूमिका. | डॉ. उमा काळे – माळी | पुणे | 46 |
| 11 | चारूता सागर यांचा कथेतील सांस्कृतिक पर्यावरण | प्रा.डॉ. प्रतिभा शंकर घाग | शिक्रापूर | 48 |
| 12 | सांस्कृतिक पर्यावरण आणि आदिवासी स्त्रियांची कथा | प्रा. डॉ भवारी हनुमंत लक्ष्मण | पाबळ | 52 |
| 13 | 'सांस्कृतिक पर्यावरण आणि स्त्रीवादी कथा' | प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने | वरवंड | 59 |
| 14 | सांस्कृतिक पर्यावरण आणि स्त्रीवादी कथा | प्रा.वाडेकर छाया किसनराव | जालना | 63 |
| 15 | "सांस्कृतिक पर्यावरण–लोकगीते आणि स्त्रीजीवन एक अनुबंध...!" | प्रा. डॉ.मधुकर गणेश मोकाशी | राहू | 64 |
| 16 | "वैदु जमातीचा लोकसांस्कृतिक अनुबंध !" | प्रा. डॉ.मधुकर गणेश मोकाशी | राहू | 69 |
| 17 | सांस्कृतिक पर्यावरण आणि स्त्रीवादी कथा | प्रा .कल्पना तबाजी रोकडे | जेजुरी | 71 |
| 18 | बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी मुस्लिम कथा साहित्याच्या प्रेरणा | डॉ. पांडुरंग कंद | पुणे | 76 |

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor

# सांस्कृतिक पर्यावरण आणि कथा : सहसंबंध

प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,औंध, पुणे

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

## १.१ प्रास्ताविक :-

साहित्य व समाज यांचा संबंध झाड व माती यांच्यासारखा असतो. साहित्यकलाकृती वाचून आस्वाद घेणारा वाचक, कलाकृती व लेखक हे तीन घटक साहित्याच्या आस्वादात महत्त्वपूर्ण मानले जातात. साहित्याची निर्मिती ही नवनिर्मिती असते. या साहित्याच्या निर्मितीवर तसेच वाचकाच्या आस्वादकतेवर आर्थिक, सामाजिक, वाङ्मयीन व सांस्कृतिक घटकांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या प्रभाव पडत असतो. लेखक कोणत्या प्रकारचे साहित्य लिहितो? आणि वाचक कोणत्या प्रकारचे साहित्य वाचतो? हे सर्वस्वी त्यांची जडणघडण व जीवन कोणत्या पर्यावरणीय परिप्रेक्ष्यात घडलेले आहे यावर अवलंबून असते.

## १.२ सांस्कृतिक पर्यावरण संकल्पना व स्वरुप :-

साहित्याचा जसा समाजीवनाशी संबंध असतो, त्याचप्रमाणे साहित्याचा संबंध संस्कृतीशीही असतो. समाजसापेक्ष सर्जनशील आविष्कार म्हणजे साहित्य होय. साहित्याचे लेखन करणारा लेखक व वाचन करणारा वाचक यांची जडणघडण समाजात होत असते. लेखक जी भाषा लेखनासाठी वापरतो ती भाषा एका अर्थाने समाजाचीच निर्मिती असते. आपण ज्या समाजात जन्माला येतो त्या समाजाची भाषा, जीवनपध्दती, संस्कृती, सामाजिक परंपरा, रुढी, रीतीरिवाज, विधिनिषेध या सर्वांचाच परिणाम त्या व्यक्तीवर होत असतो. समाज कधीही स्थिर नसतो. त्यात वेगवेगळ्या स्तरावर अनेक परिवर्तने होत असतात. या सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाचा परिणाम मानवी जीवनावर होत असतो. लेखक व वाचक ज्या परिसरात राहतात तेथील वाङ्मयीन, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक पर्यावरणाचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो. समाजजीवनात धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक घटना घडत असतात. त्याचाही परिणाम साहित्यावर होत असतो. या घटनांचे प्रतिबिंब साहित्यातून दिसत असते. साठोत्तरी साहित्याने वेगळा आशय चित्रित केला. महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील इ. च्या कार्यामुळे समाजजीवनात स्वातंत्र्याची, समतेची, शिक्षणाची ओढ निर्माण झाली. ग्रामीण व दलित साहित्यातून नवीन प्रश्नांची मांडणी झाली. यंत्रसंस्कृतीने कृषीसंस्कृतीवर आक्रमण झाल्यामुळे नारबाचा गोतावळा कसा तुटला जातो याचे कारुण्यपूर्ण चित्रण आनंद यादवांनी 'गोतावळा' कादंबरीत केले. ''समाजजीवनात निरनिराळ्या स्तरांतील संतांनी मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या इतिहासात जसे भक्तियुग निर्माण केले तसेच दलित व शोषित लेखकांनी त्यात क्रांतियुगाची निर्मिती केली. पारंपरिक मूल्य नाकारणे सोपे नसते. दलित साहित्याने ती नाकारली व नवा मूल्यकोश दिला.''[१] म्हणूनच कोणत्याही कलाकृतीचा अभ्यास करताना कलाकृतीच्या निर्मितीचा कालखंड, त्या कालखंडातील समाजजीवन, सांस्कृतिक जीवन, समाजजीवनातील महत्त्वपूर्ण घटना, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक स्थिती यांचा परस्परसंबंध लक्षात घेणे आवश्यक आहे. साहित्य व समाज यांचा अतिशय जवळून संबंध असतो. ''कोणत्याही काळातील साहित्यनिर्मितीचे केंद्र त्या त्या काळातील सांस्कृतिक कोंदणाशी साकल्याने अनुबंधित असते. सामान्यतः कोंदणाकडून केंद्राकडे आणि केंद्राकडून कोंदणाकडे हा प्रवास उलटसुलट गतीने चालू असतो. त्यावर पूर्वकालीन निर्मितीचाही एक संस्कार कमी



350

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

अधिक प्रमाणात उमटलेला असतो.''[2] दररोजच्या जीवनाचे अनुबंध वाचक साहित्यात शोधत असतो. लेखक व वाचक यांचे सभोवतालच्या सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाशी एक नाते असते. सामाजिक विचारसरणी व साहित्यनिर्मिती यांचाही जवळचा संबंध आहे. विशिष्ट सामाजिक परस्थितितीत एक विचारप्रणाली प्रसृत होते. त्या काळात घडलेल्या सामाजिक, सांस्कृतिक घटना या विचारप्रणालीची जडणघडण करत असतात. त्यातूनही साहित्याची निर्मिती होते. आंबेडकरवाद, गांधीवाद, मार्क्सवाद, स्त्रीवाद या विचारप्रणालींनी (इझम) लेखकांना साहित्यनिर्मिती प्रेरणास्त्रोत पुरवलेले आहेत. दलित साहित्य व आंबेडकरवाद, ग्रामीण साहित्य व गांधीवाद, कामगार साहित्य व मार्क्सवाद, स्त्रीवादी साहित्य व स्त्रीवाद या साहित्यप्रवाहांचा व विचारप्रणालींचा सहसंबंध ज्ञातच आहे. म्हणूनच एखादया साहित्यप्रवाहाचा अभ्यास करताना त्या साहित्याच्या सांस्कृतिक परंपरा व सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरण याचीही जाणीव ठेवली पाहिजे.

## १.3 सांस्कृतिक पर्यावरण व कथा सहसंबंध :-

साहित्य व इतर कला या समाजाची सांस्कृतिक गरज भागविणारी निर्मिती आहे. समाजाने साहित्याचा वापर अनेक हेतूने केलेला आढळतो. उदा. ज्ञान, मनोरंजन, मतांचा प्रसार, धार्मिक प्रसार, पक्षप्रचार इ. ''समाजाच्या त्या त्या अवस्थेत विवक्षित आशय आणि तंत्रे यांची उपलब्धी साहित्यिकाला होत असते. यमुनापर्यटन, पण लक्षात कोण घेतो, शारदा या साहित्यकृतींचा संबंध विशिष्ट सांस्कृतिक पर्यावरणाशी आहे. खाडिलकरांच्या कीचकवध सारख्या नाटकाचे आणि काळाचे विवक्षित नाते आहे.''[3] प्रत्येक काळातील काही महत्वपूर्ण घटनांनी मानवी जीवन ढवळून निघालेले आहे. उदा. नव्वदोत्तरी कथासाहित्यात नवीन आशय वाचावयास मिळतो. आज समाजात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक असे विविध प्रश्न दिसतात. उदा. तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेला माणूस, दशहतवाद, चंगळवादी संस्कृती, स्त्रीपुरुषातील अनैतिक संबंध, महिलांवर होणारे अत्याचार, जातीय विषमता इ. आज ज्या सांस्कृतिक पर्यावरणात आपण रहात आहोत त्या जीवनाचे प्रश्न आपल्या कथेतून मांडण्याचा प्रयत्न आजच्या कथाकारांनी केला पाहिजे. समकालीन प्रश्नांना भिडणारे साहित्य लेखकाने लिहिले पाहिजे.

विभावरी शिरुरकरांनी 'कळयांचे निःश्वास' या कथासंग्रहातून स्त्रीमनाचे सखोल विश्लेषण केले. सामाजिक समस्या व रुढी परंपरा यामुळे तरुण मुली, स्त्रियांची झालेली परवड या कथासंग्रहातून चित्रित केलेली आहे. स्त्रीजीवनातील वैवाहिक समस्या, जातीच्या बाहेर लग्न करणे गैर आहे का? असे प्रश्न या कथांतून मांडलेले आहेत. अरविंद गोखले यांच्या कथेतून विविध जातीची माणसे भेटतात. महायुद्ध, बेकारी, चलेजाव आंदोलन, जातीय दंगली, फाळणी इ. अनेक घटनांची त्यांच्या कथांना जोड लाभलेली आहे. गंगाधर गाडगीळांच्या कथेतून मध्यवर्गीय समाजाच्या जीवनात निर्माण झालेली भकास पोकळी जाणवते. उदा. किडलेली माणसे, सुखी माणसे इ. कथा. त्यांच्या कथेतून समकालीन जीवनाची उद्ध्वस्तता, किडलेपणा, हिणकसपणा चित्रित झालेला आहे. दिलीप चित्रे आणि ह.मो. मराठे यांनी मध्यमवर्गीय जीवनातील दांभिकपणा कथेतून चित्रित केलेला आहे. भास्कर चंदनशीव यांच्या अनेक कथा दलित, स्त्रीवादी, ग्रामीण, जनवादी साहित्याशी नाते सांगणाऱ्या आहेत. याचे कारण म्हणजे भास्कर चंदनशिव यांचे पदव्युत्तर शिक्षण मिलींद महाविद्यालयात झाले. तेथील सांस्कृतिक पर्यावरणाचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्वावर झाल्याचे दिसते. त्यांची कथा शेतकऱ्यांचे दारिद्र्य, ग्रामीण भागातील जातीय ताण तणाव चित्रित करते. नव्या परीवर्तनाला सामोरे जाणारी त्यांची कथा आहे. याचा प्रत्यय जांभळढव्ह,



351

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

मरणकळा, अंगारमाती, नवी वारुळं, बिरडं आदी कथासंग्रहातून येतो.

गौरी देशपांडे यांच्या कथेतून स्वच्छंदवादी व स्वतंत्रपणे जीवन जगणारी स्त्री दिसते. सामाजिक संकेतांना झुगारुन त्या जीवन जगल्या. देशविदेशात भ्रमंती, विविध संस्कृतीचे संस्करण, स्वतंत्र विचार करण्याची पध्दती यामुळे त्यांच्या साहित्यावर, पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. 'आहे हे असे आहे' या त्यांच्या कथासंग्रहातून स्त्रीपुरुष संबंधातील खोटेपणा, दांभिकपणा यावर त्यांनी भाष्य केले आहे. 'कावळा चिमणीची गोष्ट' या कथेतून कावळ्याची पुरुषी मानसिकता, आताचे स्त्रीपुरुष संबंध यांवर उपरोधीकपणे भाष्य केलेले आहे.

मिलिंद बोकील यांच्या उदकाचिया आर्ती, झेन गार्डन या कथासंग्रहातून धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रश्न, स्त्री पुरुष नात्यातील व्यक्तिस्वातंत्र्य, समाजकार्यासाठी झटणारे कार्यकर्ते यासारखे विषय मांडलेले आहेत. प्रिया तेंडुलकर यांचे 'जन्मलेल्या प्रत्येकाला, ज्याचा त्याचा प्रश्न आणि जावे त्यांच्या वंशा हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत. महानगरीय जीवनाचा वेग, जागेच्या समस्या, बकालपणा, प्रचंड गर्दीतील एकटेपणा असे आशयविश्व त्यांच्या कथेतून येते. दलित कथेतून त्या त्या काळातील सांस्कृतिक पर्यावरणाचे, त्यातील महत्त्वाच्या घटनांचे उल्लेख आलेले दिसतात. बाबुराव बागुल यांच्या मरण स्वस्त होत आहे, जेव्हा मी जात चोरली या कथासंग्रहातून व सूड कथेतून सांस्कृतिक पर्यावरणातील घडामोडींचे मोठ्या प्रमाणात चित्रण आलेले आहे. माणसाचे जगणे, दारिद्र्य, गरिबी, स्त्रीजीवन, व्यसनाधीनता, समाजातील जातीय हेवेदावे या सर्वांचे चित्रण बाबुराव बागूल यांच्या कथेतून आलेले आहे. अध्यात्म मार्गातही स्त्रीकडे बघण्याची पुरुषी वृत्ती 'सूड' मधून वाचकाच्या लक्षात येते.

प्रा. वृषाली मगदूम यांचे विराणी गाणी, साकव, कोलाज, डोहविभ्रम इ. कथासंग्रह प्रसिध्द आहेत. स्त्रीजीवनाचे सूक्ष्म अवलोकन, प्रत्यक्षात स्त्रीविकासासंदर्भात कार्य करणाऱ्या सामाजिक संघटनेच्या त्या कार्यकर्त्या आहेत. स्त्रीवर्गाचे यातनामय जीवन, भौतिक सुखाच्या पलीकडे असणारे रितेपण व विवशता, स्त्री पुरुष संबंधातील व्यामिश्रता याचे दर्शन त्यांच्या कथासंग्रहातून दिसते. एड्सला बळी पडलेल्या दुर्दैवी स्त्रिया, भ्रष्टाचाराशी संबंधित माणसे , मातृत्वविषयक कथा, प्रौढ कुमारिकांचे प्रश्न, घटस्फोटाचे प्रश्न, घरातील व्यक्तींचीच स्त्रियांवर असणारी वासनामय नजर, घटस्फोटामुळे होणारी अपत्यांची मानसिक स्थिती अशा अनेक अंगांनी स्त्रीजीवनाचे भावविश्व प्रा. वृषाली मगदूम यांनी उलगडून दाखविले आहे.

थोडक्यात मानवी जीवन हे फारच गतिमान झाले आहे. दररोजच्या जीवनात असंख्य घटनांची मालिका निर्माण होत असते. त्यामुळे त्याचे जीवन कधी कधी अस्थिर होऊन जाते. सांस्कृतिक पर्यावरणात या सर्व घडामोडींचा समावेश होतो. याचा लेखकाला वेध घेता आला पाहिजे.

**१.४ समारोप :-**

समाजात विविध घटना घडत असतात. या सामाजिक व सांस्कृतिक घटनांचे साहित्यावर परिणाम होत असतात. कधीकधी हे परिणाम लगेच जाणवतात. तर कधी ते यथावकाश जाणवतात. काही वेळा या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन करणाऱ्या घटनांचे मांडवल करुन वेगळ्या प्रकारचे साहित्य लिहिले जाण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. लेखकाने साहित्यनिर्मिती करताना त्या प्रदेशातील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटनांचाही अभ्यास करावा. साहित्यनिर्मितीची प्रेरणा ही निःसंशयपणे सामाजिक



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

352

Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

अस्तित्वातून निर्माण झालेली असते.

**संदर्भटीपा :-**

१. जनार्दन वाघमारे, 'साहित्यचिंतन', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९२, पृ. ८३.
२. गो. म. कुलकर्णी, 'आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी', मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, प्र.आ., १९९४, प्रास्ताविक.
3. डॉ. यशवंत मनोहर, 'नवे साहित्यशास्त्र', विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ., २००१, पृ. २४८.

# सदानंद देशमुखांच्या कथेमधील बदलते सांस्कृतिक पर्यावरण



353

# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume V [illegible] ISSN [illegible]-207X (Print)
Issue I [illegible] IMPACT FACTOR : 4.205

January 2018



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

354


Cosmos


Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | उत्तरआधुनिक कादंबरी आणि मराठी वाचनव्यवहार | [1] प्रा .अविनास हुंबरे<br>[2] प्रा. गजानन भोसले | 99-104 |
| 28 | वाचन संस्कृतीच्या विकासात ग्रंथालयाचे योगदान | प्रा. डॉ. मुतवल्ली मैजोद्दीन मैनोद्दीन | 105-108 |
| 29 | वाचनसंस्कृती विकासात ग्रंथालयांची बदलती भूमिका | प्रा. कल्पना नारायण गावडे | 109-111 |
| 30 | वाचन संस्कृती चळवळ विकासासाठीचे विविध उपक्रम | डॉ ह. सो. बिडवे | 112-115 |
| 31 | वाचनसंस्कृती आणि माहिती तंत्रज्ञान | डॉ . राजेंद्रसिंग देवरे | 116-117 |
| 32 | मानवी जीवनात वाचनाचे महत्व | [1] प्रा. सुवर्णा खोडदे<br>[2] डॉ. शारदा कदम | 118-121 |
| 33 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | प्रा मिनाक्षी गोणारकर | 122-124 |
| 34 | वाचन संस्कृती आणि बदलत्या अभिरूचीत प्रसारमाध्यमांचे मानवी जीवनातील स्थान | डॉ. नानासाहेब पवार | 125-128 |
| 35 | छंद वाचणाचा पाया समृध्द जीवनाचा | प्रा. निता शिंदे | 129-130 |
| 36 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | भगवान केशव गावित | 131-133 |
| 37 | वाचन संस्कृती आणि माहिती तंत्रज्ञान एक अभ्यास | डॉ. जी. आर. पवार | 134-135 |
| 38 | ग्रंथालये व वाचनसंस्कृतीचा विकास | [1] प्रा . एकनाथ शिवाजी झावरे<br>[2] प्रा . डॉ . सुभाष दिनकर आहेर | 136-137 |
| 39 | वाचन संस्कृति का विकास और व्यंग्य | प्रा. रसाळ आर. एस. | 138-140 |
| 40 | वाचन संस्कृती विकासातील ग्रंथालयाची भूमिका | डॉ . कुंभार कल्याण निलाप्पा | 141-145 |
| 41 | ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञान वापराच्या बदलाचे व्यवस्थापन व ग्रंथपालांचे कौशल्य | दत्तात्रय शामराव पाटील | 146-150 |
| 42 | वाचनाचे महत्त्व व गरज आणि ग्रंथालयाची भूमिका | मनिषा निमराज जाधव | 151-153 |
| 43 | एकविसाव्या शतकात वाचनाभिरूची निर्माण करण्यात शैक्षणिक ग्रंथालयाची भूमिका | प्रा. मंगेश वामनराव वागदे | 154-156 |
| 44 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ . प्रज्ञा अनिल भोसेकर | 157-159 |
| 45 | वाचन कौशल्य : तंत्र आणि प्रकार | प्रा. तुकाराम चव्हाण | 160-162 |
| 46 | वाचन संस्कृतीच्या विकासात ग्रंथालयाची भूमिका | आदिनाथ गोपीनाथ दरंदले | 163-164 |
| 47 | वाचन संस्कृती महत्व, तंत्र व उपाययोजन | ए. बी. आनंदकर | 165-169 |
| 48 | वाचन संस्कृती.. समाज..वास्तव | डॉ. सीमा काळभोर | 170-172 |
| 49 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | उमेश मारुती सिरसट | 173-174 |
| 50 | वाचन संस्कृतीचा विकास | डॉ. प्रीती पाटील | 175-178 |
| 51 | वाचनसंस्कृती आणि माहिती तंत्रज्ञान | आशा चंद्रशोक जिरगे | 179-181 |
| 52 | संगणकीकृत ग्रंथालयातील वाचनाचे कौशल्य आणि तंत्र | [1] आशा मोतीराम कांबळे<br>[2] वीना म. कांबळे | 182-183 |
| 53 | वाचन संस्कृतीचा विकास | आरती ज्ञा. बोराडे | 184-187 |




355

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

VOLUME-V (I) Impact Factor: 4.205 ISSN (Print): 2394-207X
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

# ग्रंथालये व वाचनसंस्कृतीचा विकास

[1]प्रा. एकनाथ शिवाजी झावरे (ग्रंथपाल)
[2]प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर (सहयोगी प्राध्यापक)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध पुणे.

**प्रास्ताविक:** भाषेची श्रवण, भाषण, वाचन व लेखन ही मूलभूत अशी चार कौशल्ये आहेत. श्रवण व वाचन ही ज्ञानग्रहणाची तर भाषण व लेखन ही ज्ञान प्रकटीकरणाची कौशल्ये आहेत. श्रवण व वाचन कौशल्यामुळे माणूस बहुश्रुत होतो. वाचन ही तशी मानसिक स्वरूपाची प्रक्रिया आहे. वाचन ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. केवळ छापील मजकूर वाचता येणे म्हणजे वाचन नव्हे. तर त्या मजकुराचा अर्थ समजणे फार महत्त्वाचे असते. शब्द वाचणे, त्यांचा अर्थ समजणे ही वाचनाची पहिली पायरी आहे. त्यानंतर विविध शब्द एकत्र येऊन वाक्य तयार होते

**ग्रंथालय महत्त्व:** ग्रंथ हेच गुरू व ग्रंथ हेच खरे मित्र. जो ग्रंथांच्या संगतीत असतो तो कधीही एकटा नसतो. ग्रंथ वाचनातून दूरदृष्टीचा विकास होतो, ज्ञानात भर पडते, सुसंस्कृत व पारदर्शक अशा मनाची जडणघडणही होते. ग्रंथालयात विविध प्रकारची ग्रंथसंपदा असते. ललित साहित्य, संत साहित्य, समीक्षा, लोकसाहित्य, विज्ञान, अध्यात्म, धार्मिक, आरोग्य, इतिहास, भूगोल, संस्कृती, स्पर्धापरीक्षा, संगणक इ. विषयक ग्रंथावरोबरच विविध वर्तमानपत्रे, मासिके, पाक्षिके, दिवाळी अंक इ. विपुल साहित्यही ग्रंथालयात असते. पुस्तकांच्या संगतीत दिवस कसा जातो तेही समजत नाही.

लेखकाला वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्यही ग्रंथालयाच्या माध्यमातून होते. एक दुवा म्हणूनच ते लेखक व वाचक यांच्यात कार्य करतात. 'शहाणे करून सोडावे सकळजन' हे जणू बीदवाक्य उराशी ठेवून ग्रंथालये कार्यरत असतात. ज्ञानलालसा वैचारिक जडणघडण मनाला चालना बज्ञानदानाचे कार्य ग्रंथालयामार्फत होते. भारतातील आजचा युवक अनेक आवर्तनात सापडला आहे. दैवशरणता, प्रवाहपतितता, स्थितीवादी, वृत्ती, भावनिक लाटांवर हेलकावे खाणारी मानसिकता, समूहशरणता इत्यादी बाबींना रोखू शकणारे बुद्धिप्रामाण्य युवकांमध्ये रुजण्यासाठी योग्य वाचन ही सर्वात मोठी उपाययोजना आहे'. यासाठी ग्रंथालयांची आवश्यकता आहे.

'गाव तेथे वाचनालय' या उक्तीप्रमाणे खेड्यापाड्यात सर्व ठिकाणी वाचनालये होणे गरजेचे आहे. वाचनालय हे खऱ्या अर्थाने गावाचे वैभव असते. शहरे तसेच खेड्यापाड्यात असणारी सार्वजनिक वाचनालये ही वाचनसंस्कृती जोपासणारी प्रमुख केंद्रेच आहेत. तसेच अनौपचारिक स्वरूपाचे लोकशिक्षण देणाऱ्या त्या पाठशाळाच आहेत. या ज्ञानमंदिराची प्रतिष्ठा मात्र प्रत्येकाने जपली पाहिजे. गाव-प्रदेश-राज्य-राष्ट्र तसेच जागतिक पातळीवरील माहिती आपल्याला ग्रंथालयात मिळते. त्या अर्थाने ही सार्वजनिक वाचनालये आधुनिक माहिती केंद्रेच आहेत. आज मात्र काही अंशाने मान्य करावे लागते की काही वाचनालये नुसतीच मनोरंजन केंद्रे झालेली आहेत. आपल्याकडे येणारा वाचक कोणत्या प्रकारची पुस्तके वाचतो, त्याच्या अभिरूचीस वळण लावता येईल का? याचाही विचार वाचनालयांनी केला पाहिजे. वाचनालयाकडूनसुध्दा सुसंस्कृत माणूस घडविण्याची प्रक्रिया पूर्ण होऊ शकते.

"काळोखाचा भेद कराया निघालेत हे सकल जन
ज्ञानमंदिरी या घडवू आम्ही नव्या युगाचे बहुजन"

अशी ध्येये मनाशी टरवून वाचनालयांनी वाटचाल केली पाहिजे. प्लेटो या विचारवंताने म्हटलेले आहे की, 'उदात्त विचाराने वागणारी चांगली माणसे निर्माण करणे हा शिक्षणाचा खरा उद्देश आहे'. हा उद्देश सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून पूर्ण होऊ शकतो.

**वाचन व्यासंग व ग्रंथालयाची भूमिका:** वाचनाचे महत्त्व अपार आहे. वाचनामुळे आपल्या अनुभवात भर पडते. चिकित्सक वाचनातून व्यासंग वाढीस लागतो. जीवनाकडे पाहण्याचे नवनवीन दृष्टिकोन समजतात. माहितीसंग्रह होऊन माणूस बहुश्रुत होतो. ग्रंथांच्या तुलनात्मक व सखोल वाचनाने वक्तृत्वास संदर्भमोल प्राप्त होते. वाचनातून स्वतःला व इतरांनाही आनंद देता येऊ शकतो. पुन:पुन्हा केलेल्या वाचनाने स्मरणशक्ती वाढीस लागते. वाचनाचा व्यासंग असलेल्या व्यक्तीस समाजात मान्यता मिळते. तसेच त्या व्यक्तीचे विचार निश्चित व ठाम असतात. आपली संस्कृती व परंपरा तसेच एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली? या सर्वांची माहिती ग्रंथवाचनातून मिळते. वाचकाला नवनवे शब्द, म्हणी, वाक्प्रचार यांची माहिती मिळून



356

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67

भाषाकोश समृध्द होतो. त्यासाठी मूल्यमापनात्मक आकलनाची गरज आहे. ग्रंथवाचनातून विचार करणे, मनन–चिंतन-प्रकटीकरण इ. प्रकियांना चालना मिळते. "मराठी भाषा संवर्धनाच्या प्रकियेत प्रथमत: भाषा विषयाची मूलभूत नऊ क्षेत्रे विकसित झाली पाहिजेत."[2] 1. श्रवण, 2. भाषण, 3. वाचन, 4. लेखन, 5. आकलन, 6. कार्यात्मक व्याकरण 7. स्वयंअध्ययन, 8. भाषेचा व्यवहारात उपयोग, 9. शब्दसंपत्तीवर प्रभुत्व.

आजच्या परिस्थितीत ग्रंथालयांनी लोकमानस घडविण्याची भूमिका पार पाडली पाहिजे. गो. ग. आगरकर यांच्या मते "माहिती व करमणूक हे वाचनाचे हेतू आहेत. पुस्तके हे मित्र आहेत. वाईट मित्रांप्रमाणेच वाईट पुस्तकांचाही सहवास टाळावा. चांगल्या वाचनातून सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व आकारास येते." आगरकरांच्या म्हणण्याचा अर्थ एवढाच की वाचकाजवळ वाचनदृष्टी हवी. कारण ग्रंथ हे निराशेच्या गर्तेत सापडलेल्या व्यक्तीला प्रेरणा देऊ शकतात, मार्गदर्शन करू शकतात.

"ग्रंथ आमचे साथी, ग्रंथ आमचे हाती
ग्रंथ उजळती अज्ञान-अंधकाराच्या राती"

ग्रंथ हे जीवनात पथदर्शक व मार्गदर्शकाचीही भूमिका पार पाडतात. वाचनाने माणूस घडतो, ज्ञानाच्या कक्षा वाढतात. आजच्या स्पर्धायुगात तर असे म्हणता येईल "वाचाल तर वाचाल." समर्थ रामदासांनी अतिशय मार्मिक व योग्य शब्दांत म्हटलेले आहे.

"दिसामाजी काहीतरी ते लिहावे
प्रसंगी अखंडित वाचीत जावे."

वरील ओळींचा अर्थबोध झाल्यास 'अभ्यासोनी प्रगट व्हावे' या उक्तीचे महत्त्व समजेल; परंतु खेदाने म्हणावे लागते की, आजच्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड कमी होत आहे. टी.व्ही संस्कृतीमुळे, मोबाईल संस्कृतीमुळे, वाचनसंस्कृती कमी होत आहे. यासाठी वाचनालयाने गावातील जास्तीत जास्त लोक, तरूण कसे वाचनालयात येतील, वाचक होतील यासाठी विशेष प्रयत्न करावे. आपल्या परिसरातील वाचकांची आवड व गरज लक्षात घेऊन ग्रंथसपदा वाचनालयात ठेवावी. संशोधक तसेच अभ्यासकांना संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून द्यावेत. साक्षरता प्रसारासाठी कार्यक्रम राबवावे. व्यक्ती साक्षर झाली म्हणजे ती वाचनालयात येऊ शकेल. 'गाव तेथे वाचनालय, एक सभासद एक आलय'. म्हणजे 'घरटी एक वाचक' असा उपक्रम राबविल्यास प्रत्येक घरात वाचनालय पोहोचू शकते. समाजाचे प्रबोधन व्हावे या दृष्टिकोनातून विविध प्रकारच्या व्याख्यानमाला, परिसंवाद, चर्चासत्र आयोजित करावे. महिला, विद्यार्थी व पुरूष यांच्यासाठी वक्तृत्व, निबंध स्पर्धांचेही आयोजन करावे. प्रत्येक गावातील वाचनालय हे त्या गावाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक विकासाचे प्रमुख केंद्र व्हावे. वाचनाची चळवळ एक जनचळवळ करण्यासाठी गावागावातील ग्रंथालयांनी विविध उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे. विविध दिनविशेषानिमित्त वक्तृत्व, निबंध, काव्यस्पर्धांचे आयोजन करून तरूणांच्याव नागरिकांच्या वाचनकौशल्यास प्रेरणा द्यावी. गावागावात, शाळा, महाविद्यालयात ग्रंथउत्सव, ग्रंथप्रदर्शन आयोजित करावे. काही वेळा ग्रंथांचे सामूहिक वाचन करावे. त्यातील अर्थ समजून सांगावा. ग्रंथांवर चर्चा घडवून आणाव्यात. त्यातूनही ग्रंथवाचनाची आवड तयार होईल.

सार्वजनिक वाचनालये ही आपल्या सर्वांनाच ज्ञानदान करणारी शाळाच असते. याठिकाणी वाचकांनी काही पथ्ये पाळली पाहिजेत. उदा. मोठयाने वाचू नये, ग्रंथ किंवा इतर साहित्याची पाने खराब करू नये, फाडू नये, परवानगीशिवाय ग्रंथसाहित्य बाहेर नेऊ नये, वाचनालयात धूम्रपान करू नये. वाचनाखेरीज गप्पा मारत बसू नये. ही पथ्ये पाळली म्हणजे इतरांनाही त्रास होणार नाही.

**समारोप:** माणसाला चांगल्या सवयी असाव्यात. त्यांपैकी वाचन हा एक चांगला छंद आहे; परंतु अश्लील पुस्तकांच्या वाचनातून विकृत मनोवृत्ती तयार होऊ शकते म्हणून सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वास पोषक असे साहित्य आपण वाचले पाहिजे. ग्रंथांच्या सान्निध्यात जीवन फुलून येते. जीवनास नवा अर्थ प्राप्त होऊ शकतो. शिव खेरा यांची You can win (यश तुमच्या हातात) Live with honour (जगा सन्मानाने जगा) आनंद यादवांचे झोंबी, शिवाजी सावंत यांची मृत्युंजय तसेच समाजसुधारकांची चरित्रे, विविध लेखकांची आत्मचरित्रेही वाचकांना प्रेरणा देण्याचे काम करतात. शिव खेरा यांच्या पुस्तकावरील वाक्य फार महत्त्वाचे आहे. "विजेते वेगळया गोष्टी करत नाही तर ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात." हे वाक्य तसेच संपूर्ण पुस्तक वाचकास प्रेरणा देते.

## संदर्भ

संपा. विजय नाहटा, लोकराज्य वाचन विशेषांक, वाचन: एक अमृतानुभव, जून-जुलै 2011, पृ. 25.
डॉ. रोहिणी तुकदेव, डॉ. प्रदीप कर्णिक, भाषिक विनिमय: तत्त्व आणि व्यवहार, पुनर्मुद्रण, मुक्त विद्यापीठ प्रकाशन, नाशिक, 2004, पृ. 2.



357

# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume V
Issue I

ISSN : 2394-207X (Print)
IMPACT FACTOR : 4.205

January 2018


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67




358

Cosmos


Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya



# अनुक्रमणिका



| अ.क्र. | शोधनिबंधाचे नाव | नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| 1. | वाचन प्रेरणा दिवस ते राष्ट्रीय परिषद | [1]प्रा. विठ्ठल नाईकवाडी<br>[2]प्रा. वसंत गावडे | 1-3 |
| 2. | वाचन व समाज. सहसंबंध | प्रा. डॉ. चंद्रकांत भगवंत पोतदार | 4-6 |
| 3. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | प्रा.शिल्पा अश्विनकुमार पाटील | 7-10 |
| 4. | वाचन संस्कृतीचा विकास | बाळासाहेब शांताराम देविकर | 11-13 |
| 5. | वाचनसंस्कृतीचा विकास होणे काळाची गरज | प्रा. वर्षा अ. तिडके (शनिवारे) | 14-16 |
| 6. | वाचन कौशल्य तंत्र आणि प्रकार | डॉ. हनुमंत लक्ष्मण भवारी | 17-20 |
| 7. | वाचनकौशल्य, तंत्र आणि प्रकार वाचकांमध्ये रुजविण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका | [1]प्रा. महादेव नागनाथ चव्हाण<br>[2]प्रा. सुधीर रामचंद्र माळी<br>[3]प्रा. श्रीमती ज्योती रमेश यादव | 21-26 |
| 8. | नकाशा वाचनाचे तंत्र व कौशल्य | [1]प्रा. रमेश गोपाळे<br>[2]डॉ. विलास पाटील | 27-32 |
| 9. | वाचनसंस्कृती व माहिती तंत्रज्ञान | कुंडलिक चिंधू पारधी | 33-35 |
| 10. | संशोधन कार्यात ग्रंथालयांची बदलती भूमिका | [1]डॉ. एन.एस.गिरी<br>[2]प्रा. दिपाली रामदास चिंचवडे | 36-38 |
| 11. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ. लहू दिगंबर वाघमारे | 39-41 |
| 12. | वाचन संस्कृतीचा विकास | श्रीम. मनिषा प्रकाश वरवडेकर | 42-46 |
| 13. | ग्रंथालयाची बदलती भूमिका-पुस्तकाच गाव | व्यंकट सूर्यवंशी | 47-52 |
| 14. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | वसंत गावडे | 53-57 |
| 15. | माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ग्रंथालयाची भूमिका | सौ. पाटोळे स्मिता प्रकाश | 58-60 |
| 16. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | प्रा. अमोगसिद्ध चेंडके | 61-64 |
| 17. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ . शैलेंद्र पंढरीनाथ काळे | 65-66 |
| 18. | छात्राध्यापकांचा ग्रंथालयाचा वापर वाढवण्यासाठी उपचारात्मक कार्यक्रम व त्याची परिणामकारकता. | संध्या गिरीष यादव | 67-72 |
| 19. | वाचन संस्कृती वाढीसाठी ग्रंथालयाची भूमिका | डॉ. आर. एच. थोरवे | 73-76 |
| 20. | कार्ल मार्क्सचे वाचन आणि लेखन | डॉ. घ. ना. पांचाळ | 77-78 |
| 21 | संशोधनातील साहित्य संदर्भाचा अभ्यास | डॉ. एस. के. ढगे | 79-82 |
| 22 | वाचन व तरूण: सहसंबंध आणि वास्तव | प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी | 83-84 |
| 23 | वाचनकौशल्य व वाचनसंस्कृतीचा विकास | प्रा . डॉ . सुभाष दिनकर आहेर | 85-87 |
| 24 | वाचन कौशल्य : तंत्र आणि प्रकार | गणेश निवृत्ती चौधरी | 88-90 |
| 25 | वाचन व समाज सहसंबंध आणि वास्तव | प्रा. डॉ. अर्चना कुदळे | 91-93 |
| 26 | संशोधनात ग्रंथालयाचे महत्त्व | डॉ. सी. पी. हासे | 94-98 |





359

VOLUME-V (I) Impact Factor: 4.205 ISSN (Print): 2394-207X
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

# वाचनकौशल्य व वाचनसंस्कृतीचा विकास

प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे.

**प्रास्ताविकः**मानवी जीवनात भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भाषेशिवाय माणूस व्यवहार व विचारांची देवाणघेवाण करू शकत नाही. म्हणूनच समाजातील प्रत्येक व्यक्तीने भाषेचे जतन व संवर्धन केले पाहिजे. भाषिक कौशल्याच्या विकासाबरोबरच भाषिक कौशल्याचे उपयोजन विद्यार्थ्यांना करता येणे आवश्यक आहे. श्रवण, भाषण, वाचन व लेखन ही भाषेची प्रमुख अशी चार कौशल्ये मानली जातात. प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये श्रवण, भाषण, वाचन व लेखन या कौशल्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने शिक्षकांनी उपक्रमशील राहिले पाहिजे.

**वाचन कौशल्याचे स्वरूप व महत्त्वः** श्रवण व वाचन ही ज्ञानग्रहणाची तर भाषण व लेखन ही ज्ञानप्रगटीकरणाची,आत्माविष्काराची कौशल्ये म्हणून ओळखली जातात. या सर्वच कौशल्याकडे दुर्लक्ष होत आहे. भाषेचे जतन व संवर्धन या कौशल्यांच्या विकासातून शक्य आहे. अन्यथा भाषेला दूरावस्था प्राप्त होते. वि. वा. शिरवाडकर म्हणतात "डोक्यावर सोनेरी मुकुट आणि अंगावर फाटके कपडे अशा अवस्थेत ती मंत्रालयाच्या दाराशी उभी आहे."[1] (पहिली जागतिक मराठी परिषद अध्यक्षीय भाषण 12 व 13 ऑगस्ट 1989) त्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ आपण लक्षात घेतला पाहिजे. त्यांच्या मते स्वभाषेचे ज्ञान हे केवळ भाषाज्ञान नसते; ते माणसाला आपल्या संस्कृतीच्या तळापर्यंत घेऊन जाते. "मराठी भाषा संवर्धनाच्या प्रक्रियेत प्रथमत: भाषा विषयाची मूलभूत नऊ क्षेत्रे विकसित झाली पाहिजेत."[2] 1. श्रवण 2. भाषण 3. वाचन 4. लेखन 5. आकलन 6. कार्यात्मक व्याकरण 7. स्वयंअध्ययन 8. भाषेचा व्यवहारात उपयोग 9. शब्दसंपत्तीवर प्रभुत्व.

वाचन केल्यामुळे माणूस ज्ञानी होतो. समाजात त्यास एक विद्वान म्हणून मान्यता मिळते. वाचनाचा व्यासंग असलेल्या व्यक्तीचा समाजात नावलौकिक वाढतो. त्या व्यक्तीकडे आदराने पाहिले जाते. खरे पाहता वाचन ही एक मानसिक प्रक्रिया आहे. मजकुराचे अर्थग्रहण करणे म्हणजे वाचन होय. वाचन हे ज्ञानप्राप्तीचे महत्त्वाचे कौशल्य आहे. वाचनाचे मुख्यत: दोन प्रकार आहेत. मूक वाचन व प्रगटवाचन या दोन्ही वाचनाच्या प्रकारांचे फायदे व काही मर्यादाही आहेत.

ग्रंथ हेच गुरू. ग्रंथ हेच खरे मित्र. जो ग्रंथांच्या संगतीत असतो तो कधीही एकटा नसतो. ग्रंथ वाचनातून दूरदृष्टीचा विकास होतो. ज्ञानात भर पडते. सुसंस्कृत व पारदर्शक अशा मनाची जडणघडणही होते. प्लेटो या विचारवंताने म्हटलेले आहे की, 'उदात्त विचाराने वागणारी चांगली माणसे निर्माण करणे हा शिक्षणाचा खरा उद्देश आहे'. हा उद्देश वाचन कौशल्यातून सफल होऊ शकतो. वाचनाचे महत्त्व अपार आहे. वाचनामुळे आपल्या अनुभवात भर पडते. चिकित्सक वाचनातून व्यासंग वाढीस लागतो. जीवनाकडे बघण्याचे नवनवीन दृष्टिकोन समजतात. अन्य प्रदेशातील लोकजीवन, समाजजीवन, संस्कृती, इतिहास, भूगोल इ. घटकांची माहिती मिळते. माहितीसंग्रह होऊन माणूस बहुश्रूत होतो. ग्रंथांच्या तुलनात्मक व सखोल वाचनाने वक्तृत्वास संदर्भमोल प्राप्त होते. वाचनातून स्वत:ला तसेच इतरांनाही आनंद देता येऊ शकतो. पुन:पुन्हा केलेल्या वाचनाने स्मरणशक्ती वाढीस लागते. वाचनाचा व्यासंग असलेल्या व्यक्तीस समाजात मान्यता मिळते. तसेच त्या व्यक्तीचे विचार निश्चित व ठाम असतात. आपली संस्कृती, परंपरा एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली?या सर्वांची माहिती ग्रंथवाचनातून मिळते. वाचकाला नवनवे शब्द, म्हणी, वाक्प्रचार यांची माहिती मिळून भाषाकोश समृध्द होतो. त्यासाठी मूल्यमापनात्मक आकलनाची गरज आहे. वाचनातून विचार करणे, मनन, चिंतन, प्रकटीकरण इ. प्रक्रियांना चालना मिळते.

**वाचनसंस्कृतीचा विकास** वाचन हे नुसतेच कौशल्य न राहता ती एक सवय झाली पाहिजे. त्यातूनच वाचनसंस्कृतीचा विकास होऊ शकतो. ग्रंथ हे जीवनात पथदर्शक व मार्गदर्शकाचीही भूमिका पार पाडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'ग्रंथ हेच गुरू' असे म्हणत. अखंडपणे अठरा-वीस तास वाचन ते करीत असत. वाचनाने माणूस घडतो. ज्ञानाच्या कक्षा वाढतात. आजच्या स्पर्धा युगात तर असे म्हणता येईल "वाचाल तर वाचाल" समर्थ रामदासांनी अतिशय मार्मिक व योग्य शब्दांत म्हटलेले आहे.

"दिसामाजी काहीतरी ते लिहावे
प्रसंगी अखंडित वाचीत जावे."



360

वरील ओळींचा अर्थबोध झाल्यास **'अभ्यासोन प्रगट व्हावे'** या उक्तीचे महत्त्व समजेल. परंतु खेदाने म्हणावे लागते की आजच्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड कमी होत आहे. अद्ययावत मोबाईल,आयपॅडसारखी गॅजेटस्, फेसबुक, व्हॉटस् अॅप, ट्विटरसारख्या सोशल मिडियामध्ये आजची तरूणपिढी मग्न झालेली आहे. वि. का. राजवाडे यांच्या मते 'ग्रंथ वाचनाने माणूस खूप विचार करू लागतो. विचारांचा खल झाल्यावर आचार बनतात व नंतर समाजाचे पाऊल पुढे पडते'. जबाबदारीने लेखन करणे हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच महिष्णुतेने वाचणे हे वाचकाने महत्त्वाचे मानले पाहिजे. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे आणि तंत्रज्ञानाच्या स्फोटामुळे वाचन संस्कृती हरवत चाललेली आहे. गो. ग. आगरकर यांच्या मते"माहिती व करमणूक हे वाचनाचे हेतू आहेत. पुस्तके हे मित्र आहेत. वाईट मित्रांप्रमाणेच वाईट पुस्तकांचाही सहवास टाळावा. चांगल्या वाचनातून सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व आकारास येते." आगरकरांच्या म्हणण्याचा अर्थ एवढाच की वाचकाजवळ वाचनदृष्टी हवी. कारण ग्रंथ हे निराशेच्या गर्तेत सापडलेल्या व्यक्तीला प्रेरणा देऊ शकतात, मार्गदर्शन करू शकतात. वाचन हा संस्कृतीचा एक भाग आहे. म्हणूनच वाचनसंस्कृतीच्या संवर्धनासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. 'रे ब्रॅडबरी' या विचारवंताने म्हटले आहे की, "You don't have to burn books to destroy a culture, just get people to stop reading them."[3] वाचन हे केवळ मनोरंजनासाठी किंवा करमणुकीसाठी असू नये. तेवढाच मर्यादित उद्देश न ठेवता ज्ञानप्राप्ती हा खरा वाचनाचा मूळ उद्देश आहे. माणूस ज्या क्षेत्रात काम करतो. त्या क्षेत्रात जर त्याला यशस्वी व्हायचे असेल तर त्या क्षेत्रातील नवनवे ज्ञान, माहिती व अद्ययावत कौशल्ये त्याने प्राप्त केली पाहिजे.

**अ. वाचनसंस्कृतीच्या विकासासाठी काही उपक्रम :**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचनाचे महत्त्व त्यास समजावे यासाठी शालेय तसेच महाविद्यालयीन स्तरावर उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

1. विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रे, मासिके वाचनाची आवड निर्माण करावी. त्यातील महत्त्वाच्या नोंदी करण्यास सांगावे. महत्त्वाच्या घटनांवर विद्यार्थ्यांना आपले मत व्यक्त करावयास सांगावे.
2. 'मला आवडलेले पुस्तक' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यास त्याच्या आवडीचे पुस्तक वाचल्यानंतर त्या विषयावर वर्गात बोलण्यासाठी संधी द्यावी, प्रेरणा द्यावी. जेणेकरून अशा विद्यार्थ्यांमध्ये सूक्ष्मवाचन करणे, त्याच्या नोंदी करणे, टिपणे काढणे, चिंतन करणे, भाषण करणे आदी कौशल्याचा विकास होईल.
3. महाविद्यालयातील, शाळेतील विविध उपक्रमांना विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्यासाठी प्रेरित करावे. वक्त्यांची भाषणे ऐकून ज्ञानात भर पडेल. संदर्भग्रंथाचे वाचन करण्याची प्रेरणा मिळेल.
4. विद्यार्थ्यांना ग्रंथालयात घेऊन गेले पाहिजे. यासाठी **'ग्रंथालय भेट'** उपक्रम आयोजित करावा. विद्यार्थ्यांना पुस्तके हाताळू द्यावी. त्यांच्या आवडीने पुस्तकांची निवड करू द्यावी.
5. वाचनपेटी उपक्रम: विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड विकसित व्हावी यासाठी विविध विषयावरील पुस्तके, कथा, कादंबरी, नाटके, चरित्रे, आत्मचरित्रे यांचा संग्रह असलेली वाचनपेटी वर्गात आणावी. तास दोन तास विद्यार्थ्यांना पुस्तके वाचण्यास द्यावी. वाचलेल्या पुस्तकावर चर्चा घडवून आणावी किंवा मुलांना आपली मते व्यक्त करण्यासाठी सांगावीत.
6. वाचन हे सूक्ष्मपणे करावे. शब्दांचा अर्थ, शुध्दलेखनाचे नियम आदी लक्षात घेऊन वाचन करावे. अशी सूचना विद्यार्थ्यांना देऊन समानार्थी शब्द, म्हणी, वाक्प्रचार यांचेही वर्गात वाचन करून शिक्षकांनी सोदाहरण तो भाग समजावून द्यावा. शब्दकोडी हा सुध्दा एक वाचनवृद्धीसाठी महत्त्वाचा उपक्रम ठरू शकतो.
7. परिसरातील वाचनालय, ग्रंथालये यांना नियमितपणे विद्यार्थ्यांनी भेटी द्याव्यात. सभासद व्हावे. वाचन करावे.
8. विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, निबंध आदी स्पर्धांचे आयोजन करावे. स्पर्धेची तयारी म्हणून विद्यार्थी वाचन करतील.
9. तरूणांमध्ये वाचनप्रवृत्ती-वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी आठवड्यातून एक दिवस नो गॅजेट डे पाळावा. म्हणजे त्यादिवशी मोबाईल व इतर तंत्रज्ञानाच्या साधनांपासून दूर राहून पुस्तकाच्या सान्निध्यात राहून वाचन करावे.
10. नजरेने वाचनावरोबरच वेगाने वाचन करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित करावे. त्यासाठी शिक्षकांनी, पालकांनी सराव करून घ्यावा.
11. जनवाचन उत्सव, ग्रंथमेळा, ग्रंथयात्रा, ग्रंथप्रदर्शने यासारखे उत्सव गावागावात लोकांना एकत्र करून पुस्तकांचे वाचन करावे. त्यावर चर्चा घडवून आणाव्यात. वाचन ही लोकचळवळ झाली पाहिजे. महात्मा फुले यांनी 'शेतक-याचा आसूड' हस्तलिखित लोकांना वाचून दाखविल्यानंतर पुस्तक तयार केले.



361

12. वाचन हे नुसतेच वाचन न राहता ते अर्थपूर्ण वाचन, चिकित्सक वाचन,सर्जनशील वाचन झाले पाहिजे. त्यातून विद्यार्थ्यांमध्ये भाषण व लेखन कौशल्याचा विकास होईल.
13. वाचकांनी ग्रंथ खरेदी करावेत. यासाठी पुस्तकांच्या किमतीही माफक असाव्यात. सामान्य वाचकही ग्रंथ खरेदी करू शकेल अशा किमती असाव्यात.
14. वाचनसंस्कृती समाजात रूजविण्यासाठी शासनानेही विविध उपक्रम राबवावेत. उदा. गाव तेथे वाचनालय, गाव तेथे ग्रंथालय,विविध स्पर्धांचे आयोजन, वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने कथावाचन, काव्यवाचन, निबंधलेखन आदी उपक्रमांचे आयोजन करणे. महाराष्ट्र शासनातर्फे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांचा 15 ऑक्टोबर हा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो.

शमारोपः विद्यार्थ्यांमध्ये वाचनकौशल्य व वाचनसंस्कृतीचा विकास करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे. डॉ. अब्दुल कलाम म्हणतात की पुस्तकांच्या सहवासात मला नेहमीच ज्ञानाबरोबर आनंदही मिळाला. माझ्या घरात सुमारे पन्नास हजार पुस्तकांचे संग्रहालय आहे. वाचनाचे महत्त्व महात्मा फुले यांनीही सांगितलेले आहे. व्यक्तिमत्त्व घडविणारे व समृद्ध करणारे वाचनासारखे दुसरे साधन नाही. पुस्तक वाचनाने आपणास प्रेरणा मिळते.

## संदर्भ

1. वि. वा. शिरवाडकर यांचे अध्यक्षीय भाषण, 1 ली जागतिक मराठी परिषद, 12 व 13 ऑगस्ट 1989.
2. डॉ. रोहिणी तुकदेव, डॉ. प्रदीप कर्णिक, भाषिक विनिमय: तत्त्व आणि व्यवहार, पुनर्मुद्रण, मुक्त विद्यापीठ प्रकाशन, नाशिक, 2004, पृ. 2.
3. संपा. विजय नाहटा, लोकराज्य वाचन विशेषांक, वाचन: एक अमृतानुभव, जून - जुलै 2011, पृ. 6.



362

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2018
SPECIAL ISSUE-XXXII

# Foreign Policy of India

**Guest Editor**
Prin. Dr. B. S. Yadav
K.J. Somaiya College of Arts, Commerce & Science,
Kopargaon, Tal. Kopargaon,
Dist. Ahmednagar (MS) India.

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Dept. of Marathi,
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist. Nashik (MS) India.

Executive Editors of the Issue : Dr. V. D. Awari & Dr. S. M. Devare
K.J. Somaiya College of Arts, Commerce & Science, Kopargaon.

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

363

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 500/-

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 32 : Foreign Policy of India
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
January 2018

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, **Riyadh Kingdom of Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Dr. Sharad Birhade** - D. N. College, Faizpur.
- **Prof. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul.
- **Prof. Atul Suryawanshi** - S. S. M. M. College, Pachora.
- **Prof. B. P. Shewale** - M. S. G. College, Malegaon Camp, Nashik.

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. D. A. Suryawanshi** - Principal, R. C. Patel College of Education, Shirpur, **Dhule.**
- **Dr. Sandip D. Mundhe** - Head, Lib. Science, Sambhajirao Kendre College, **Jalkot, Latur**
- **Dr.Y. H. Saner** - Principal, Abhay College of Education, **Dhule**
- **Dr. D. D. Patil** - Principal, Arts, Science and Commerce College, Chopda, **Jalgaon**

**Review Committee -**

- **Dr. Uttam V. Nile** - P. S. G. V. P. Mandals Arts, Cmmerce, Science College, Shahada
- **Dr. Sanjay Dhondare** - Abhay Womens College, Dhule
- **Dr. Rekha Gajare** - Head, Dept. of Hindi, P.O.Nahata College, Bhusawal
- **Dr. Ramesh Sambhaji Kure** - Head, N. W. College, Akhala Balapura Dist-Hingoli
- **Dr. S. K. Wadekar** – M. S. G.College, Malegaon Camp, Dist- Nashik

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

- **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik**

**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258



364

3
Jalgaon
gaon
Jalgaon
India.
re
le.
, Latur
ada
li
checked the
f the papers
tor
Nashik
665398258
4gmail.com

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 32 : Foreign Policy of India
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
January 2018

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | India's Role in South Asia: New Perspective | Dr. Sunil Kawade | 07 |
| 2 | Dynamics of the New Foreign Policy | Prof. Arun Shinde | 10 |
| 3 | India's Foreign Policy in a Changing World | Prof. P. S. Auti | 13 |
| 4 | India Bhutan Bilateral Relations | Dr. Vilas Awari | 17 |
| 5 | Relations among South Asian Nations | Prof. Shriniwas Bhong | 22 |
| 6 | India's South Policy: Continuity and Change | Dr. Aliva Mishra | 27 |
| 7 | Pro-Active Foreign Policy of Modi Government | Dr. Ashwini Mohopatra | 29 |
| 8 | India's Relation with Developed Countries | Prof. D. D. Thakare | 30 |
| 9 | Indo-Asian Cooperation | Dr. Jyoti Bidlan | 34 |
| 10 | India's Relation with Bangladesh | Dr. Girish Kulkarni | 37 |
| 11 | Geo-Political Disputes between India- China | Prin. Dr. Eknath Khandave | 40 |
| 12 | India's Foreign Policy Towards Twenty-Twenty | Dr. S.M. Wagh | 46 |
| 13 | India and BRICS | Dr. Suresh Devare | 49 |
| 14 | One World 2020: A Decade-long Vision for India's Relations with the United Nations: | Prof. Ganesh S. Rode | 52 |
| 15 | India Myanmar Relation and Human Rights | Prof. Kailas Wagh | 55 |
| 16 | India's Foreign Policy an Historical Perspective | Prof. M.B. Sonawane | 58 |
| 17 | India's Role in South Asian Regional Cooperation | Prof. Sanjay A. Marathe | 61 |
| 18 | South Asian Association for Regional Cooperation (SAARC): Achievements and Hindrances | Mrs. Meenal Kshirsagar | 63 |
| 19 | Foreign Policy: Challenges before India Today | Prof. N.D. Pagar | 69 |
| 20 | New Directions in Indian Foreign Policy | Prof. N. A. Patil | 72 |
| 21 | China and India's Development Strategies | Sanyukta R. Patil | 75 |
| 22 | India – China Border Issue | Prof. A.B. Raut | 78 |
| 23 | India's New Foreign Strategy | Dr. Vilas Sadaphal | 81 |
| 24 | Politics of Foreign Policy in India | Dr. Sambhaji Tanpure | 84 |
| 25 | An Overview of Indo-China Relations since Independence | Dr. Ankush Aware | 87 |
| 26 | Political Transformation in Nepal | Prof. Dinesh Halde | 91 |
| 27 | India's Foreign Policy and BRICS | Prof. Eknath Nirmal | 94 |
| 28 | India's Foreign Policy & the Relationship with Us | Prof. Dattu Shende | 97 |




365

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013) January 2018
Special Issue 32 : Foreign Policy of India
UGC Approved No. 40705 & 44117

# India's New Foreign Strategy

**Dr. Vilas Sadaphal**
Department of Political Science
Dr. B.R.Ambedkar College Aundh, Pune

**Introduction:**

Most nations and large ones at that do not easily alter their international orientation. States tend to be conservative about foreign policy. Fundamental changes in foreign policy take place only when there is a revolutionary change either at home or in the world. Much as the ascent of Deng Xiaoping in the late 1970s produced radical changes in Chinese foreign policy, India's relations with the world have seen a fundamental transformation over the last decade and a half. A number of factors were at work in India. The old political and economic order at home had collapsed and externally the end of the Cold War removed all the old benchmarks that guided India's foreign policy. Many of the core beliefs of the old system had to discard and consensus generated on new ones. The collapse of the Soviet Union and the new wave of economic globalization left India scrambling to find new anchors for its conduct of external relations. This paper is examines the origin, dynamics and the implications of India's new foreign policy strategy.

Most Indians agree that its first Prime Minister Jawaharlal Nehru had defined a unique foreign policy for India at the very dawn of its independence. Despite many critics of his world view, a broad national consensus had emerged around Nehru's ideas on independent foreign policy, non-alignment, and third world solidarity. Since the 1990s, though, the challenge for the Indian leaders has been to reinterpret Nehru's ideas to suit the new political context that had confronted it. The new Indian leaders could neither denounce Nehru nor formally reject Nehru's ideas, for that would have invited serious political trouble. Yet they had to continually improvise and refashion India's foreign policy to suit the new requirements.

This has not been easy. The tension between the imperative of the new and the resistance of the old ideas on how to conduct foreign policy is real and is unlikely to end in the near future. The fear of the new and fondness for the old continue to be reflected in all aspects of Indian diplomacy from engaging the United States to an optimal strategy towards the smallest of the neighbors. The "new" foreign policy of India is indeed work in progress. Yet it is not difficult to see that the direction of Indian diplomacy has changed substantially since the end of the cold war amidst internal and external impulses.

**Structural Changes in India's World View**

Underlying India's current foreign policy strategy are a set of important transitions in India's world view. Not all of these were articulated self-consciously or clearly by the Indian political leadership. A few of those changes stand out and are unlikely to be reversed. The first was the transition from the national consensus on building a "socialist society" to building a "modern capitalist" one. The socialist ideal, with its roots in the national movement, had so dominated the Indian political discourse by the early 1970s, that a Constitutional amendment was passed in 1976 to make the nation into a "socialist republic". But 1991 saw the collapse of the Soviet Union, the veritable symbol of

ISSN : 2348-7143
January 2018

socialism, and the edifice of India's state-socialism began to crumble. Adapting to the new challenges of globalization now became the principal national objective. The change in the national economic strategy in 1991 inevitably produced abundant new options on the foreign policy front.

Implicit in this was the second transition, from the past emphasis on politics to a new stress on economics in the making of foreign policy. India began to realize in the 1990s how far behind it had fallen the rest of Asia, including China, in economic development. With the socialist strait jacket gone, and the pressures to compete with other emerging markets, Indian diplomacy now entered uncharted waters. In the past, foreign for aid was so symbolic of Indian diplomacy that sought to meet the government's external financing requirements as well as developmental needs. India was now seeking foreign direct investment, and access to markets in the developed world.

The slow but successful economic reforms unleashed the potential of the nation, generated rapid economic growth and provided a basis to transform its relations with great powers, regional rivals Pakistan and China, and the neighborhood as a whole. A third transition in Indian foreign policy is about the shift from being a leader of the "Third World" to the recognition of the potential that India could emerge as a great power in its own right. While independent India always had a sense of its own greatness, that never seemed realistic until the Indian economy began to grow rapidly in the 1990s. In the early decades of its independent existence, India viewed many of the international and regional security issues through the prism of the third world and "anti-imperialism". The 1990s, however, brought home some painful truths. There was no real third world trade union, that India believed it was leading. After a radical phase in the 1970s, most developing nations had begun to adopt pragmatic economic policies and sought to integrate with the international market. Much of the developing world had made considerable economic advances, leaving the South Asia way behind. While the rhetoric on the third world remained popular, the policy orientation in India's external relations increasingly focused on India's own self interest. There was a growing perception, flowing from the Chinese example, that if India could sustain high growth rates it had a chance to gain a place at the international high table.

The 1990s also saw India begin discarding the "anti-Western" political impulses that were so dominant in the world view that shaped Indian diplomacy right up to 1991. Rejecting the "anti-Western" mode of thinking was the fourth important transition of Indian foreign policy. As the world's largest democracy, India was the most committed to Western political values outside the Euro-Atlantic world. Yet the Cold War saw India emerge as the most articulate opponent of the Western world view. A strong anti- Western bias crept into Indian foreign policy supported by the left as well as the right and underwritten by the security establishment. The disappearance of the Soviet Union and China's rise as a great power demanded that India to break the decades old anti-Western approaches to foreign policy.

**Conclusion :**

Finally, the fifth transition in Indian foreign policy in the 1990s was from idealism to realism. Idealism came naturally to the Indian elite that won independence from the British by arguing against colonialism on the basis of first principles of Enlightenment. The new leaders of India had contempt for "power politics". They believed it was a negative but



367

lingering legacy from 19th century Europe that had no relevance to the new times of the mid 20th century. India tended to see its role in world politics as the harbinger of a new set of principles of peaceful coexistence and multilateralism which if applied properly would transform the world. Although Nehru demonstrated realism on many fronts, especially in India's immediate neighborhood, the public articulation of India's foreign policy had the stamp of idealism all over it. Since the 1990s, India could no longer sustain the presumed idealism of its foreign policy. India had to come to terms with the painful reality that its relative standing in the world had substantially declined during the Cold War. Much like Deng Xiaoping who prescribed pragmatism for China, the Indian leaders began to emphasize practical ways to achieve power and prosperity for India.

**References :**


- Bagchi, Indrani. (2017) India Eyes Key Asia Role amid US-China Tension. *The Times of India*, February 20.
- Karaganov, Sergey. (2016). Global Challenges and Russia's Foreign Policy. *Strategic Analysis*, 40 (6), 461-473.
- Bajpai, Kanti. (2015). 'Five Approaches to the Study of Indian Foreign Policy', in David Malone and others (Ed.), *The Oxford Handbook of Indian Foreign Policy* (pp. 21-34). Oxford: OUP.
- Bajpai, Kanti and Pant, Harsh V. (Eds.). (2013). *India's Foreign Policy: A Reader.* New Delhi: OUP.
- Mukherjee, Rohan and Malone, David. (2011, January). Indian Foreign Policy and Contemporary Security Challenges. *International Affairs*, 87, Issue 1, 87-104.

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

December - 2017

SPECIAL ISSUE-XXI

# भाषा, साहित्य आणि अनुवाद
# भाषा, साहित्य और अनुवाद
# Language, Literature and Translation

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67




अतिथी संपादक :
डॉ. भाऊसाहेब गमे
प्राचार्य,
महात्मा गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर
सहा. प्राध्यापक,
महात्मा गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)

सहयोगी संपादक : प्रा. रघुनाथ वाकळे (हिंदी विभाग), प्रा. कमलाकर गायकवाड (इंग्रजी विभाग)

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

369

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal* ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013) December 2017
Special Issue 21 : भाषा, साहित्य आणि अनुवाद
UGC Approved No. 40705 & 44117

## अनुक्रमणिका

Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune 67


| अ. नं. | शोध निबंधाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | **मराठी विभाग** | | |
| १ | भाषा, साहित्य आणि अनुवाद यांचा सहसंबंध | डॉ. पृथ्वीराज तौर | ० |
| २ | भाषांतर : स्वरुप आणि व्याप्ती | डॉ. भाऊसाहेब गमे | २ |
| ३ | अनुवाद संज्ञा-संकल्पना | डॉ. अरुण पाटील | २ |
| ४ | अनुवादित साहित्य : संकल्पना व स्वरूप | डॉ. सागर लटके | २ |
| ५ | अनुवाद प्रक्रिया : स्वरूप | डॉ. शिवप्रसाद वायाळ | ३ |
| ६ | अनुवाद प्रक्रिया व पद्धती | डॉ. सुभाष आहेर | ३ |
| ७ | अनुवादाचे प्रकार आणि मराठी साहित्य | डॉ. उज्ज्वला देवरे, सुनील खैरनार | ३ |
| ८ | अनुवाद प्रक्रिया आणि सृजनशीलता | डॉ. प्रमोद आंबेकर | ४ |
| ९ | भाषांतर आणि अनुवाद | डॉ. किरण पिंगळे | ४ |
| १० | लोकसमुहाकडून पौराणिक विषयावर अनुवादित झालेली मथुरा लभान बोलीतील लोकगीते | डॉ. भगवान साबळे | ५ |
| ११ | ख्रिस्तपुराण : रूपांतर, लिप्यंतर, प्रकारांतर व भाषांतर | प्रा. विनय मडगावकर | ५ |
| १२ | अनुवादाचे सांस्कृतिक महत्त्व | प्रा. माधवी पवार | ६ |
| १३ | अनुवाद : संकल्पना व महत्त्व | डॉ. गीतांजली चिने | ६ |
| १४ | काव्यानुवाद 'जगतांना' : साहित्य, भाषा व अनुवाद | प्रा. नवसो परब | ६ |
| १५ | भारतीय कवितांचे मराठी अनुवाद | डॉ. विद्या सुर्वे-बोरसे | ७ |
| १६ | अन्य भाषांमधून मराठी भाषेत अनुवादित झालेले ग्रंथ : एक आकलन | डॉ. स्नेहल मराठे | ७ |
| १७ | एक अजरामर अनुवाद – 'एक होता कार्व्हर' | डॉ. शीला गाढे | ७ |
| १८ | प्रसारमाध्यमे आणि इतर क्षेत्रातील अनुवाद संधी | डॉ. प्रकाश शेवाळे | ८ |
| | **हिंदी विभाग** | | |
| १९ | अनुवाद साहित्य का स्वरूप एवं संकल्पना | डॉ. व्ही. डी. सूर्यवंशी | ८ |
| २० | अनुवाद : स्वरूप, आवश्यकता एवं समस्या | डॉ.अनिता नेरे, डॉ.योगिता हिरे | ९ |
| २१ | अनुवाद : स्वरूप और विवेचन | के. के. वच्छाव | ९ |
| २२ | अनुवाद साहित्य कि व्याप्ती और प्रासंगिक महत्त्व | डॉ. डी. बी. महाजन | ९ |
| २३ | अनुवाद एवं प्रयोजनमुलक हिंदी | डॉ. गजानन वानखेडे | ९ |
| २४ | अनुवाद : स्वरूप, महत्त्व एवं उपयोगिता | डॉ. सुनिता कावळे | १० |
| २५ | अनुवाद साहित्य : स्वरूप, संकल्पना एवं आवश्यकता | प्रा. रविंद्र ठाकरे | १० |




370

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 21 : भाषा, साहित्य आणि अनुवाद | December 2017
UGC Approved No. 40705 & 44117

# अनुवाद प्रक्रिया व पध्दती

**डॉ. सुभाष दिनकर आहेर**
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे
मो. ९८५०२०९३७२
ई-मेल : subhashdaher@gmail.com

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67

## प्रास्ताविक :-

अनुवादास सृजनात्मक लेखनाचा दर्जा बहाल झालेला नसला तरी भाषांतराचे महत्त्व नाकारले गेलेले नाही. विशेषतः १९६० नंतर विपुल भाषांतरे झालेली आहेत. त्या भाषांतरांचे स्वागतही झालेले आहे. अनुवादाच्या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, आंतरभारती इत्यादी संस्था भक्कमपणे काम करीत आहेत. जागतिकीकरणामुळे जग जवळ आले असून विचारांची देवाण-घेवाण वाढल्याने अनुवादक हे स्वतंत्र करियरच झाले आहे. १९ व्या शतकाच्या पहिल्या पाऊणशे वर्षाच्या कालखंडाला 'भाषांतरयुग' असे म्हटले गेले. एका भाषेच्या आशयाला अन्य भाषेत आणणे म्हणजे भाषांतर. परंतु एवढाच सीमित अर्थ घेता येणार नाही. संस्कृत भाषेमध्ये भाषांतराला 'छाया' असे म्हणतात. या भाषांतरामुळे भाषाभाषांतील वैचारिक, साहित्यिक, भावनिक, कलात्मक देवाणघेवाण होते. एखाद्या भाषेचे ज्ञान म्हणजे तिचे व्याकरण, रचना, वाक्प्रचार, म्हणी, शब्दसंग्रह, भाषेतील सांस्कृतिक, सामाजिक संकेत, वाङ्मयीन संकेत, त्या भाषेची जडणघडण इ. विषयक माहिती हवी. मराठीतून लिहिल्या गेलेल्या साहित्याचे जसे अन्य भाषांत भाषांतर झाले तसेच आज मराठीत विविध भाषांमधून भाषांतराच्या मार्गाने आलेले वाङ्मय विपुल प्रमाणात आहे. जग जवळ येत असल्याचा प्रत्यय या भाषांतराच्या स्वरुपात अनुभवता येत आहे.

## अनुवाद – संकल्पना व स्वरुप :-

RESEARCHJOURNEY

अनुवादामुळे परेदशी आणि देशी साहित्याचा परिचय वाचक वर्गाला झाला. अनुवाद करीत असताना तो केवळ शब्दशः अनुवाद असू नये. तर त्यातून मूळ लेखकाच्या भावना आणि मूळ साहित्यकृतीचा आत्मा आविष्कृत झाला पाहिजे. 'अनुवाद मुलभाषा की सामग्री के भावों की रक्षा करते हुए उसे दुसरी भाषा में बदल देना है'[१] To translate is to change into another language retaining the sense. अनुवादाच्या माध्यमातून भिन्न संस्कृती, देश, समाज याचे आकलन होते. जगातील महान ग्रंथांचा परिचय अनुवादातूनच होतो. भारतीय पंचतंत्र कथा प्रथम फारसीमध्ये अनुवादित झाल्या त्यानंतर अरबीमध्ये, अरबीमधून फ्रेंच भाषेत व फ्रेंच भाषेतून इतर युरोपीय भाषांमध्ये अनुवादित झाल्या.

अनुवाद हा शब्द संस्कृत आहे. यामध्ये अनु हे उपसर्ग आहे. वाद म्हणजे कथन. अनुवाद या शब्दाचा अर्थ पुनःकथन. 'स्त्रोतभाषा के साहित्य की सौन्दर्य चेतना, कलापूर्ण प्रयोग आदि को समझना तथा उसका प्रभावशाली ढंग से लक्ष्यभाषा में प्रतिस्थापना करना कला-मर्मज्ञ अनुवादक द्वारा ही सम्भव है।'[२] साहित्यकृतीच्या अनुवादास एजरा पाउंड यांनी साहित्यिक पुनर्जीवन म्हटलेले आहे. काही अभ्यासक 'साहित्यिक पुनःसृष्टी' असेही म्हणतात.

## अनुवाद प्रक्रिया व पध्दती :-

अनुवादाच्या संदर्भात महत्त्वाच्या बाबी म्हणजे आपण अनुवाद कशाचा करतो आहोत? तो का करतो आहोत? तो अनुवाद कसा करतो आहोत? अनुवाद कोणासाठी करतो आहोत? सक्षम अनुवादाच्या



371

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013) Decem
Special Issue 21 : भाषा, साहित्य आणि अनुवाद 2017
UGC Approved No. 40705 & 44117

माध्यमातून एक संबंध समाज व त्याचे सांस्कृतिक जीवन याचा परिचय अन्य भाषिक वाचकास होतो. भाषांचे ज्ञान व दोन्ही भाषांची व्याकरणिक रचना, शब्दार्थ यांचाही विचार अनुवाद प्रक्रियेत प्रामुख्याने जातो. भारतात हिंदी व इंग्रजी या भाषांचे स्थान अन्य भारतीय भाषांपेक्षा भाषांतराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण स जाते. हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा आहे, तर इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे. १८१८ पासून सुरु झालेल्या सत्तेमुळे मराठीचा इंग्रजीशी संपर्क आला. इंग्रजीतील लेखनाचे मराठीत विपुलतेने भाषांतर होऊ लागले. ते १८७४ या कालखंडास 'भाषांतर युग' म्हटले गेले. मूळ लेखक व भाषांतरकार हे सामान्यतः एक नसतात. ते भिन्न व्यक्तिमत्त्व असलेली दोन माणसे असतात. मूळ लेखनाकडे पाहण्याची भाषांतरक दृष्टीही वेगळी असू शकते आणि ज्या भाषेमध्ये तो भाषांतर करीत असतो. त्या भाषेची प्रकृती, प्रवृत्ती, स इत्यादींचा विचारही भाषांतरामध्ये लक्षात घेतलेला असतो. 'भाषाभाषांतील वैचारिक, साहित्यिक, भा कलात्मक पूल जोडण्याचे कार्य भाषांतरामुळे साधले जात असते'[३] भाषेला पुष्कळदा सांस्कृतिक, ध आध्यात्मिक व सामाजिक जीवनाचे संदर्भ असतात त्याचाही अभ्यास अनुवादकाचा असला पाहिजे. भाषेची सांस्कृतिक व वैचारिक अंगाने जडणघडण झालेली असते. शब्दांच्या विविध अर्थच्छटा व भा यांचाही बारकावा माहीत असणे आवश्यक आहे. उदा. त्रींहशी, चींहशी हे शब्द इंग्रजीत आहेत. त्यांचे पर्यायी शब्द वडील, बाप, पिता, बाबा, पिताजी, जनक, बा, आई, माय, माता, जननी, जन्मद असल्याने त्यापैकी कोणता शब्द निवडायचा हे मूळ उताऱ्यातील भाषिक वातावरणावर अवलंबून असते.

शासन निर्णय आणि परिपत्रकांच्या मराठी भाषांतरात होणाऱ्या चुकांमुळे अनेकदा राज्य स नामुष्की ओढावते म्हणून भाषांतर करणे म्हणजे मूळ भाषेतील अर्थ दुसऱ्या भाषेत ध्वनित झाला जपानमध्ये अनेक नागरिकांना व्यवहार करताना इंग्रजी भाषेचा अडसर जाणवतो. त्यांची ही सोडविण्यासाठी कावासकी–एनईसी कार्पोरेशन या कंपनीने एक यंत्रमानव बनविलेला आहे. इंग्रजी व भाषेतून तो भाषांतर करतो. जपानीतून या कामासाठी त्याच्या मेंदूत २५ हजार इंग्रजी व ५० हजार जपा साठविण्यात आलेले आहे. 'पापेरो' असे यंत्रमानवाचे नाव आहे. काही अनुवादकांच्या मते अनुवा स्वतंत्र कलाकृती मानले जावे. भाषांतराचा मूळ उद्देश ज्ञानप्रसार, विचारसंवर्धन, ज्ञानसंवर्धन, अन्य संस समाजजीवनाचे आकलन हे आहेत. म्हणूनच अनुवादकाजवळ पुढील गुण असणे आवश्यक आहेत.

१. दोन्ही भाषांचे, दोन्ही भाषा बोलणाऱ्या समाजसंस्कृतीचे पुरेसे आकलन
२. मूळ भाषेतील वाङ्मय / साहित्य अभ्यास, वाचन इ.
३. लक्ष्य भाषेतील वाङ्मय / साहित्य अभ्यास वाचन इ.
४. व्याकरणिक रचना, प्रतीके, प्रतिमा, आलंकारिक रचना, शब्दच्छटा आदींची जाण
५. लेखातील विचाराचे आकलन, त्या लेखनाच्या ज्ञानक्षेत्राचा परिचय इ.

भाषाआकलन व भाषाउपयोजनाचे कौशल्य अनुवादकाजवळ असणे आवश्यक आहे.

अनुवादक हा लेखक असलाच पाहिजे. मूळ लेखकाने त्याला जे भावलेले असते ते लिहिले ते त्याला जसे भावले तसेच्या तसे त्याच आशयासह परभाषिक वाचकांपर्यंत पोहोचवणे म्हणजे लेखनाप्रमाणेच अनुवाद ही सुध्दा मेंदूला थकवणारी, कष्टप्रद तरीही आनंद देणारी प्रक्रिया आहे. अनुव दोन्ही भाषांबरोबर म्हणजे ज्या भाषेत अनुवाद करायचा त्या (लक्ष्यभाषा) व ज्या भाषेतून कराय (स्त्रोतभाषा) जवळीक असली पाहिजे. बंगाली भाषेत अमिष दाखवले असे म्हणताना 'मुळा दाखव म्हणतात. मराठीत मात्र मुळा दाखवला असे न म्हणता गाजर दाखविले असे म्हणावे लागेल.

**अनुवाद महत्त्व :-**

आधुनिक युगामध्ये अनुवादास फार महत्त्व प्राप्त झाले आहे. संत ज्ञानेश्वरांनीही भगवद्गीतेचा



372

ISSN : 2348-7143
December 2017

'ज्ञानेश्वरी' हा अनुवाद केला. संस्कृतमधील रामायण, महाभारत आणि पंचतंत्र इ. ग्रंथ जगातील अनेक भाषांमध्ये अनुवादित झालेले आहेत. होमर, सॉक्रेटीस, शेक्सपीयर आदींची रचना जगभरात अनुवादाच्या माध्यमातून पोहोचलेल्या आहेत. विलीयम जोन्स यांनी अतिशय कष्टपूर्वक संस्कृत भाषा अवगत करुन कालिदासाचे 'अभिज्ञान शाकुंतल' नाटकाचा इंग्रजी अनुवाद १७८९ मध्ये केला. त्यामुळे सर्व जगाला या नाटकाची ओळख झाली. १७९२ मध्ये जोन्सने गीतगोविंदचा अनुवाद केला.

'३० सप्टेंबर हा जागतिक भाषांतर दिन म्हणून ओळखला जातो. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ट्रान्सलेटर्स (FIT) या संस्थेने बायबलचे लॅटीनमध्ये भाषांतर करणाऱ्या St. Jerome या भाषांतरकाराच्या स्मरणार्थ १९९१ सालापासून हा दिन साजरा करण्यास प्रारंभ केला. तुलनेने दुर्लक्षित असलेल्या भाषांतर व्यवसायाचा विविध देशांमध्ये जास्तीत जास्त प्रसार करणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. तसेच सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगातील भाषांतर व्यवसायाची वाढती मागणी व महत्त्व लक्षात घेऊन त्यानुसार या व्यवसायास सन्मान व प्रतिष्ठा मिळवून देणे हा देखील यामागील एक विचार आहे. या निमित्ताने प्रोझ डॉट कॉम (www.proz.com) या इंटरनेटवरील भाषांतरकाराच्या सर्वात मोठया समुदायाने व्हर्च्युअल स्वरुपाची Translation ३ ही कॉन्फरन्स आयोजित केलेल्या आहेत. आपली भाषांतराची कामे करुन घेण्यासाठी The world bank, IBM, Honda, Ebay, Bloomberg अशासारख्या दिग्गज कंपन्या जिथे येतात, त्या प्रोझ डॉट कॉमवर ३०० हून अधिक भाषांमध्ये काम करणारे सुमारे ३,५०,००० नोंदणीकृत भाषांतरकार व दुभाषी आहेत आणि १५,००० नोंदणीकृत कंपन्या आहेत.'[४] व्हर्च्युअल कॉन्फरन्स ही एका ठरावीक दिवशी, ठरावीक वेळी इंटरनेटच्या माध्यमाद्वारे आयोजित केली जाते व जगभरातील भाषांतरकार त्या कॉन्फरन्सच्या पेजवर लॉग इन करुन तेथील मार्गदर्शनपर व्याख्याने, प्रात्यक्षिके, प्रश्नोत्तरे, नेटवर्कींग इत्यादींमध्ये प्रत्यक्ष सहभागी होतात. यामुळे प्रवासखर्च व वेळ या दोन्हींची बचत होते. यामधूनच विविध विषयासंदर्भात चर्चा होते. उदा. भाषांतराचे दर, दुभाषी होताना, मुक्त भाषांतरकारांनी मार्केटींग कसे करावे? भाषांतरकाराचे प्रकल्प व्यवस्थापन, भाषांतरासंबंधी ग्राहकाच्या अपेक्षा, भाषांतर उद्योगाचे भविष्य इ.

भाषांतर करणे ही तशी सोपी गोष्ट नाही तर अभ्यासपूर्ण बाब आहे. वरवर अनुवाद न करता मूळभाषा व लक्ष्यभाषेतील सर्व घटकांचा अनुवादकाचा अभ्यास असला पाहिजे. विभिन्न सांस्कृतिक, सामाजिक, भाषिक गटातील लोकांचे साहित्य, भाषा, संस्कृती आदीबाबत ज्ञान व माहिती अनुवादामुळे मिळू शकते. कवितेचा अनुवाद ही आव्हानात्मक व अभ्यासपूर्ण अशी बाब आहे. २१ व्या शतकात अनुवादाचे महत्त्व निश्चितच वृध्दिगंत होईल अशी खात्री आहे.

**समारोप :-**

अनुवादामुळे इतर भाषेतील साहित्याचा परिचय होतो. भाषेत नवीन शब्दांची भर पडते. भाषा वृद्धिंगत होते. अभ्यासकांनी इतर परदेशी भाषा अध्ययनाबरोबरच आपल्या देशातील इतर भाषाही शिकाव्यात, त्यातून अनुवादाचे प्रमाण वाढेल. एकच विषय विविध भागात वेगवेगळया भाषेत कशा रीतीने वर्णिला आहे. त्याचा तुलनात्मक अभ्यास करता येईल. आदिवासी भाषेतील साहित्याचाही अनुवाद होणे गरजेचे आहे. काहीवेळा मूळ लेखकाची भाषाशैली, बोली यांच्यातील आवेगाशी संगती साधणाऱ्या शब्दांच्या, वाक्यांच्या किंवा अर्थाच्या संरचना दुसऱ्या भाषेत मिळत नाही. त्यामुळे अनुवाद हा परिणामकारक न होता त्यातून अनुवादाचा दर्जा कमी होतो.

**संदर्भ टिपा :-**

१. अय्यर डॉ. एन. ई. विश्वनाथ, 'अनुवाद भाषाएँ-समस्याएँ', ज्ञानगंगा प्रकाशन, प्र.आ., दिल्ली,



373

१९९२, पृ. १४.
२. अय्यर डॉ. एन. ई. विश्वनाथ, 'अनुवाद कला, प्रभात प्रकाशन, प्र.आ., दिल्ली, १९९८, पृ
३. गोविलकर, पाटणकर 'व्यावहारिक मराठी' स्नेहवर्धन प्रकाशन, प्र.आ., पुणे, २००४, पृ. १
४. दै. लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, रविवार १२ सप्टेंबर २०१०, पृ. ४.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67
RESEARCH JOURNEY

374

VOLUME-IV, ISSUE-XII

ISSN (Print): 2394-207X
IMPACT FACTOR: 4.205
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Dr. Babasaheb Ambedkar Maha... Aundh, Pune-67

# TITLE: INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

## UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Editors: Dr. V.H. Mane, Prof. M. P. Shaikh

Language: Multilingual

Published by

INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Sneh Apartment,
Flat No. 001, Samarth Nagar, New Sangvi,
Pune- 411027

Copyrights: Editors 2014

All rights reserved

ISSN: 2394-207X (Print)
IMPACT FACTOR: 4.205

VOLUME-IV, ISSUE-XII

December -2017

375

| | | | |
|---|---|---|---|
| ५४ | मा.शरचचंद्र पवारांचे भारतीय कृषी क्षेत्रातील योगदान | प्रा.मदन जहाँगीर पाडवी | २१५-२१९ |
| ५५ | शाश्वत विकासासाठी सर्वसमावेशक नीतीचे पुरस्कर्ते शरद पवार | डॉ.जीनत खान | २२०-२२३ |
| ५६ | भारतीय संसदीय शिष्टाचार कार्य प्रणालीतील अग्रगण्य व्यक्तिमत्व - मा.शरदचंद्र पवार | डॉ.अरविंद शेलार | २२४-२२६ |
| ५७ | प्रगल्भ राजकीय संस्कृतीचे उपासक - शरद पवार | प्राचार्य डॉ.एकनाथ खांदवे | २२७-२३० |
| ५८ | शरद पवार यांची जडणघडण | प्रा.सारिका थोरात | २३१-२३३ |
| ५९ | शरद पवार आणि नामांतराचे अग्निदिव्य | डॉ.मोरे डी.ए. | २३४-२३८ |
| ६० | मा.शरद गोविंदराव पवार यांच्या राजकीय वाटचालीचा अभ्यास | [१]श्री.ज्ञानेश्वर रा.काळे<br>[२]डॉ.डी.एस.बोरकर | २३९-२४१ |
| ६१ | मा.शरद पवार यांचे क्रीडा क्षेत्राला लाभलेले योगदान | डॉ.सुदाम शेळके | २४२-२४४ |
| ६२ | महिला सबलीकरणासाठी मा. शरद पवारांचे योगदान | [१]प्रा.एकनाथ झावरे<br>[२]प्रा.मृणालिनी शेखर | २४५-२४८ |
| ६३ | मा.शरदचंद्र पवार यांचे महिला सक्षमीकरणामध्ये योगदान | [१]प्राचार्य डॉ.मंजुश्री बोबडे<br>[२]प्रा.नलिनी पाचर्णे | २४९-२५२ |
| ६४ | ग्रामीण विकासातील शरद पवार साहेबांचे योगदान | डॉ.थोपटे एम.जी. | २५३-२५६ |
| ६५ | आदरणीय लोकनेते श्री.शरदचंद्रजी पवार | डॉ.आर.एम.कोठारी | २५७-२५९ |
| ६६ | मा.शरद पवार यांच्या राजकीय वाटचालींचा अभ्यास | चलवादी हर्षल विरेंद्र | २६०-२६१ |
| ६७ | सामाजिक समतेचा महामेरू - शरद पवार | प्रा.महेंद्र कांबळे | २६२-२६४ |
| ६८ | शरद पवार यांचे राजकीय क्षेत्रातील योगदान: एक समीक्षा | प्रेमचंद गुंडू गायकवाड | २६५-२६८ |
| ६९ | आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील शरदचंद्रजी पवार | प्रा. अनिता गायकवाड | २६९-२७० |





Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

376

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67



# मा. शरदचंद्र पवार यांचे महिला सक्षमीकरणामध्ये योगदान

[1]प्राचार्य डॉ. मंजुश्री बोबडे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध, पुणे ७.
[2]प्रा. नलिनी पाचर्णे
अर्थशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध, पुणे ७.

**प्रास्ताविक:** जगातील उभरती अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उल्लेख केला जातो. जगात लोकसंख्येबाबत भारत चीननंतर २ ऱ्या क्रमांकावर आहे. (१२१ कोटी – जनगणना २०११) २१ व्या शतकातील महत्त्वाचे उद्दिष्ट स्त्री-पुरूष समानता आणि महिला सक्षमीकरण हे आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महिला सक्षमीकरण संकल्पना, महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आणि आदरणीय शरद पवारसाहेबांचे महिला सक्षमीकरणातील योगदान इ. बाबत भाष्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

**महिला सक्षमीकरण संकल्पना :** ब्राझीलमधील फावलो फेटे यांनी महिला सक्षमीकरण संकल्पना प्रथम मांडली. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांचे हक्क व अधिकार त्यांना मिळणे होय. व्यापक अर्थाने स्त्री-सबलीकरण म्हणजे स्त्री-पुरूष समानतेचा स्वीकार करणे, स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने संधी देणे, तिच्यात स्वत्वाची जाणीव निर्माण करणे, सर्व क्षेत्रात विकास करण्यासाठी संधी देणे होय.

**महिला सक्षमीकरणाची आवश्यकता :** भारतातील पुरूषप्रधान कुटुंबव्यवस्थेत स्त्रियांना दिले जाणारे दुय्यम स्थान, महिलांशी निगडीत अनेक समस्या, विषम लिंग-गुणोत्तर यामुळे निसर्गाचे सुक्ष्म संतुलन बिघडणे आणि समाजामध्ये नैतिक अपप्रवृत्ती बळावण्याचा धोका विचारात घेता देशाचा शाश्वत, स्थिर आणि समावेशक विकास हे उद्दिष्ट साध्य करणेसाठी महिलांचे सक्षमीकरण नितांत गरजेचे आहे.

**तथ्य संकलन –** प्रस्तुत शोधनिबंध पूर्णपणे दुय्यम सामग्रीवर आधारित असून दैनिक वर्तमानपत्रे, मासिके जनगणना अहवाल २०११ संदर्भ पुस्तके व ग्रंथ, संकेतस्थळे इ. च्या आधारे आवश्यक ती आकडेवारी व माहिती घेतली आहे.

**द्रष्टा लोकनेता – शरदचंद्र पवार –** आदर्श लोकप्रतिनिधी आर्थिक व सामाजिक न्यायाचा विचार केंद्रस्थानी ठेवून कार्य करणारा कार्यकर्ता, भटक्या-विमुक्तांचा तारणहार, आपत्तीव्यवस्थापनाचे शहेनशहा, फळबाग क्रांतीचे जनक, कुशल क्रीडासंघटक, ध्येयवादी शिक्षणप्रेमी, कार्यक्षम प्रशासक, आदर्श शेतकरी इ. पैलूंनी समृद्ध असणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, कार्याची उंची अवर्णनीय आहे. आकाशाच्या उंचीचे, सागराच्या खोलीचे अफाट कार्यक्षमता असणाऱ्या पवारसाहेबांच्या कार्यकतृत्वाला शब्दरूपात मांडणी करणे अवघड आहे.

**पुरोगामी विचाराचा वारसा :–** शरदरावांचे माता-पिता म्हणजे शरदाबाई आणि गोविंदराव हे पुरोगामी विचारांचे पुरस्कर्ते होते. जात-पात-धर्म स्त्री-पुरूष मुलगा-मुलगी तसेच अंधश्रद्धा इ. बाबत त्यांनी विचारांना कधी थारा दिला नाही. घरात विविध क्षेत्रातील कतृत्ववान व्यक्तिंचा राबता असल्यामुळे सामाजिक व राजकीय विषयावरील चर्चा ऐकणे तसेच शेतकरी कुटुंबात जन्म झाल्यामुळे संवेदनक्षम मन, संघटन कौशल्य मनमिळाऊ स्वभाव असणाऱ्या शरदरावांच्या मनात समाजाचे धुरीणत्वाबबात जाणीव निर्माण झाली. त्यांच्यात नेतृत्वाची आणि कतृत्वाची बीजे त्यांच्या बालवयात रूजवण्याचे काम त्यांच्या आई शारदाबाईंनी चातुर्याने केले होते. त्यांनी आपल्या सद्वृत्तीचा, सद्भावनेचा, सामाजिक बांधिलकी, नम्रतेचा व शालिनतेचा ठसा शरदरावांच्या मनावर बालवयात उमटवला होता.

**सामाजिक समता व न्यायाचे खंदे पुरस्कर्ते:** महात्मा फुले, राजर्षि शाहूमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा घेऊन तो विचार सर्वतोपरी प्रयत्न करून प्रत्यक्षात आणणारे सर्व जाती-जमाती, उपेक्षित वर्ग, महिला इ. सर्वांना



377

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh Pune-67



